विनीता देशपांडे

# फुल्लारी



# फुल्लारी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# फुल्लारी

विनीता श्रीकांत देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# फुल्लारी

## लेखिका : विनीता श्रीकांत देशपांडे

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : २८ एप्रिल २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रस्तावना

"फुल्लारी" ही सौ.विनीता श्रीकांत देशपांडे यांची दुसरी कादंबरी, पहिल्या कादंबरीच्या पावलावर पाऊल टाकून पुढे आलेली आहे. या कादंबरीबद्दल मी तिचे मन:पूर्वक अभिनंदन करते. "पाऊलावर पाऊल" हे शब्द मी जाणीवपूर्वक वापरले आहेत.

या कादंबऱ्या प्रचलित प्रकारात बसणाऱ्या नाहीत. कौटुंबिक, प्रेमकथा, सूडकथा, भयकथा, गूढकथा या प्रकारात बसत नाही. आधीच्या "स्मृत्पर्ण" या कादंबरीप्रमाणे विनीताने रहस्याच्या अंगाने कादंबरी फुलवत, रंगवत नेली आहे. अर्थातच रहस्य शेवटी उलगडून कादंबरीचा शेवट गोड होतो हे सांगायला नकोच.

भरपूर पात्रे हा विनीताच्या कादंबरीचे आणखी एक विशेष. माणसांनी घरात जितक्या सहजतेने हालचाल करावी, तितक्या सहजतेने इथे पात्र येतात-जातात. ही पात्रे नायिकेच्या सभोवतीची आहेत. नायिका एक अक्षरही बोलू शकत नसल्याने तिच्या भावभावना तिच्या मित्रमंडळीच्या माध्यमातून समजतात. अबोल आणि अनाथ असलेल्या नायिकेने आपल्या वागण्याने सर्वांना अपलेसे केले आहे. तिचे अचानक सर्वांच्या आयुष्यातून निघून जाणे, हे सर्व वाचतांना आपली उत्कंठा शेवटपर्यंत टिकेल याची विनीताने भरपूर काळजी घेतली आहे.

कादंबरीची भाषा हिंदी-मिश्रीत मराठी आहे. पण ती वाचतांना खटकत नाही कारण आजच्या तरुण पिढीची हीच भाषा आहे. या भाषेला गोडवा आहे. ती कुठेही रेंगाळत नाही. तिचा ओघ सुरवातीपासून शेवटपर्यंत एकसारखा आहे. स्वभावचित्रे गोड आहेत.

विनीताला लेखनाची ही प्रेरणा ह्या पुढेही सतत सहाय्य करो हीच शुभेच्छा.

विनीता ऐनापुरे

# मनोगत

विशेष मुलं आणि मुकबधीर मुलांसोबत काम करतांना जाणवलं त्यांना समजून घेणं खुप अवघड आहे. त्यांना उमजतांना आणि त्यांच्या भावविश्वात डोकावतांना समजलं कि त्यांचं एक वेगळं आकाश आहे, त्यांचे रंग वेगळे आहेत, आकार वेगळे, संकल्पना वेगळया, अपेक्षा वेगळया, अनुमान वेगळे आहेत. भाषाही वेगळीच आणि कधी कधी शब्द ही निशब्द होतात.

यांना समजून घेतांना सर्वमान्य सर्वसामान्यांची फुटपट्टी निकामी ठरते. त्यांचा संघर्ष असतो तो स्वत:शी आणि त्यांच्याकडे सहानुभूतीने बघणाऱ्यांशी. मग ते परिवारातील सदस्य असोत वा अवतीभवती वावरणारे किंवा त्यांना रोजच्या जगण्यात मदत करणारे. त्यांना किंव नको असते. जीवन जगण्यासाठी ढकलणारे हात नको असतात. त्यांना हवी असते साथ जे त्यांची तगमग समजू शकतील. हवा असतो एक विश्वास जो त्यांच्या आयुष्यात पुढे जाण्याची धडपड समजु शकेल. गरज असते एका प्रेरणेची जी त्यांचे कौशल्य ओळखून निश्चित दिशा देऊ शकेल.

"फुल्लारी" अशाच एका अबोल नायिकेचा प्रवास आहे.

या अबोल नायिकेचा प्रवास तिचे कुटुंब, तिच्या मित्र मैत्रीणींचे स्वगत आणि संवादातून उमगतो. या स्वगत आणि संवादाची प्रयुक्ती अर्थात परिणीती सर्वांना आवडेल अशी आशा करते.

विनीता श्रीकांत देशपांडे

"आधी इंद्रियांची जाण । मग जाण नेणीवाची
मुक प्रवास माझा । या अज्ञात परिघात"

"या जाणीव-नेणीवांच्या परिघात
समर्थपणे आयुष्याचा प्रवास करणाऱ्यांना समर्पित"




विनीता श्रीकांत देशपांडे

एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरुन काव्यवाचन प्रसारित, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन. "स्मृत्पर्ण" ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर आजही वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवि आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे.

आगामी साहित्य- "पारुषण" गुढकथासंग्रह, आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स.१९००च्या पुढचा काव्यप्रवास)

होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक

अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम

10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर.

संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com







- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf

# फुल्लारी

विनीता श्रीकांत देशपांडे

१.

**ऋतुजा**

**गंधाली**, तिचा चेहरा डोळ्यासमोरुन जात नव्हता. कोण आहे ही? कुठून आली? आपल्या घरात इतकी मुलं असतांना अबोल गंधालीबद्दल जाणून घेण्याची तळमळ मला कळत नव्हती.

"ऋतु ए ऋतु, अभिराम आला का ग?" माईच्या या प्रश्नाने मी विचारातून जागी झाले.

"येईल ग एवढ्यात." घड्याळाकडे बघत मी उत्तर दिलं खरं. डोक्यात अजूनही गंधालीच्या विचार सुरु होता.

तेवढ्यात दारापुढे रिक्षा थांबल्याचा आवाज आला आणि आम्ही दोघी घाईघाईने माजघरातून अंगणाकडे निघालो.

अभिला बघून झालेला आनंद माईच्या चेहऱ्यावर दिसत होता. फाटकापाशीच नमस्काराचे सोपस्कार झाले. माई खुप प्रेमळ असली तरी या वास्तुच्या कानाकोपऱ्यात तिची शिस्त आणि दरारा होता. आज अभिरामाने दराऱ्याच्या या भिंतीला सुरुंग लावला होता. अभिला बघताच सगळे मुलं "अभिदादा ... अभिदादा ..." करत त्याच्याकडे झेपावले. त्याच्या येण्यानं "आपलं घर" चैतन्यानं भारावून गेलं होतं. मुलं अभिला भेटण्यासाठी अंगणात जमली आणि एकच

किलबिलाट सुरु झाला. सर्वांनाच अभिशी बोलायचं होतं. तोही खूप वर्षांनी या आपल्या घरात आला होता, निदान तास दोन तास तरी बच्चेकंपनीतून त्याची सुटका होणार नव्हती. तेवढ्यात गंधाली पाण्याचा तांब्या घेऊन आली आणि अभिला बघताच थबकली, थोडी दचकली.

किती प्रश्न गंधालीच्या डोळयातून ओसंडत होते, तिच्या चेहऱ्यावरचा वैताग, त्या वैतागात भांबावलेली गंधाली बघून मी दचकलेच. एखाद्या कोकरुने केविलवाणे आपल्या आईकडे पहावं तेच भाव अभिरामला बघताच तिच्या डोळयात उमटले होते. त्याला बघताच तिच्या डोळयांच्या कडा पाणावल्या. तिच्यातील सहनसिद्धीने अश्रुंना रोखून धरलं होतं. तिच्या चेहऱ्यावरील प्रश्न आणि खंत भेदून टाकणारं होतं, अभिकडे रोखून बघणं कासावीस करणारं होतं. त्याच्या डोळयात गंधालीबद्दल ओळखिचे चिन्ह बघून मघाशी थोपवलेले प्रश्न माझ्या डोक्यात परत पिंगा घालायला लागले.

तिच्या व माझ्या प्रश्नांची उत्तरं अभिरामकडे होती का? निदान अभिरामकडे बघून तरी तसं वाटत होतं. नेमके कोणते प्रश्न? कोणती उत्तरे? इथे "आपल्या घरात" आल्यापासून गंधाली एक कोडंचं होतं, कधी न उमगणारं, कधी न उलगडणारं. तिचं अभिकडे असं एकटक रोखून बघणं अभिला असह्य झालं होतं. पुढच्या क्षणाला ती माझ्याजवळ पाण्याचा तांब्या देत अभिकडे रागाने कटाक्ष टाकत पाय आपटत खोलीकडे निघून गेली.

मी अभिकडे बघितलं, क्षणभर वाटलं गंधाली नावाचं हे वादळ फार पुर्वी त्याच्या आयुष्यात आलं असावं, माझ्या आयुष्यात तर हे गेल्या तीन वर्षांपासून धुमसतंय. आज या

वादळानं मला एका अनामिक वळणावर आणून सोडलं होतं. मी अभिरामकडे आणि तो माझ्याकडे विमनस्क बघत राहिलो.

सगळ्या मुलांचा समाचार घेत माई, अभि व मी ऑफिसकडे निघालो. तिथे माईंना भेटायला आलेल्या लोकांची गर्दी बघून आम्ही दोघं माजघराकडे निघालो. अभि गंधालीला चांगलाच ओळखत असावा हे माझ्या लक्षात आलं होतं. सगळं इतकं अचानक घडलं होतं की तो गांगरुन गेला होता.

तिन्ही सांजेची वेळ होत होती.

दोघंही निशब्द .... एक विलक्षण शांतता भवताल पसरली होती.

"चला फुल्लारी फूलों को, सौदा-सौदा फूल बिरोला..." नेगी चाचा रोजसारखं आजही झाडांना पाणी देतांना हे गाणं गुणगुणले आणि ती विलक्षंण शांतता भंगली.

"फुल्लारी .... ए फुल्लारी .... " गंधालीला नेगी चाचा फुल्लारी म्हणायचे.

ते तिला कळतही होतं का नाही, ठाऊक नाही. दोघंही गंधवेडे, झाडं- पानं- फुलं यात खुप रमायचे.

“फुल्लारी ओ फुल्लारी....” चाचांनी परत आवाज दिला आणि रमा फुलं घ्यायला पळत अंगणात आली.

"क्या चाचा, जिसे आवाज देतो हो उसे तो पताही नही है, फिर भी रोज फुल्लारी फुल्लारी चिल्लाते हो. लाओ फुल, मुझे दो. माई पुजा करने आयेगी अभी." रमा

मघाचा अंगणातला कल्लोळ आणि घरी परतणाऱ्या पक्ष्यांचा किलबिलाट क्षीण होत होता. केशरी प्रकाशात अनार्त शांतता हळुहळु वास्तुचा ताबा घेत होती. मात्र माझ्या डोक्यातला विचारांचा पिंगा काही केल्या शांत होत नव्हता.

"कोण आहे ही गंधाली? अभि, तू ओळखतोस?" ओसरीवर तुळशी वृंदावनापाशी बसत मी विचारलेच.

"हो, ऋतुजा, तू पण ओळखतेस तिला." अभिराम

"मी? ओळखते? कसं शक्य आहे अभि, गेले तीन वर्षांपासून तिचा ठावठिकाण शोधण्याचा प्रयत्न करत आहे."

"तुमच्या इथे कशी आली? केव्हा आली?" अभिराम

"तुझ्या काही प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे आहेत, माझ्या काही प्रश्नांची उत्तरं तुझ्याकडे." अभि मावळत्या सूर्याकडे बघत म्हणाला.

"काहीच प्रश्नांची? म्हणजे?"

"तू ओळखतोस न गंधालीला?" मी चिडून विचारले.

त्या क्षणी गंधालीचं कोडं अभिच सोडवू शकतो असं मला वाटायला लागलं होत. आज अभिचं "आपल्या घरात" येणं, गंधालीची व त्याची अचानक भेट होणं, तिच्या डोळ्यात

झळकलेल्या ओळखीच्या खुणा, तिला भेटल्यापासून अभिची झालेली विचित्र अवस्था. मला काहीच उमगत नव्हतं.

मुलांचा शुभंकरोतीचा घोष माजघरात घुमु लगला.

"तुला चिन्मय आठवतो का ऋतु?" अभिराम

"हो, आठवतो न, चिन्मय जगताप आणि हो त्याचा भाऊ तन्मय तो ही आठवतो."

"त्यांना एक बहीण होती. आठवतय का?” अभिराम

"हो, पुसटशी आठवते न. अविला चिडवायचे तिच्या नावावरुन. कधी भेटले नव्हते तिला. ते अमरावतीपासून दूर रहायचे.

"बार्शीटाकळीला" अभि

“हो... तिथेच. तू चिन्मय, तन्मय, अवि आपण गप्पा करत असतांना तिचा विषय हमखास निघायचा.”

“मी पुढच्या शिक्षणासाठी पुण्याला आले आणि नंतर काय झालं काहीही माहित नाही रे मला. गंधाली तिचे नाव बरोबर न रे अभि."

"हो, ....तुमची गंधाली म्हणजे चिन्मय व तन्मयची बहीण गंधाली जगताप" अभिराम शांतपणे म्हणाला.

आता मात्र मला काय बोलावं, काय करावं काहीच सुचत नव्हतं. गेल्या तीन वर्षांपासून मी गंधालीबद्दल तपास करत होते.

काही केल्या थांग लगत नव्हता. गंधाली, जेमतेम २२-२३ वर्षाची ती सावळीशी निळसर टप्पोरे डोळे, थोडंस चपटं पण अपरं नाक, कुरळे केस, नेटका बांधा सतत गंभीर आणि स्वत:ला कायम कामात गुंतवून ठेवणारी, जणु काही कुठल्याशा विचारांना बाजुला ठेवण्याचा तिचा तो प्रयत्न माझ्या नजरेतून सुटला नव्हता.

"अभि, याचाच अर्थ ही अबोल गंधाली मला ओळखत होती तर, मी तिच्या अस्तित्वाचा शोध घेत आहे हे माहिती असूनही तिने मला का कळू दिले नाही? का?"

तिला बघितल्यावर नेहमीच वाटायचं की मनामध्ये झंझावात घेऊन फिरणारं हे एक अबोल वादळ आहे, हा झंझावात नेमका काय हे आता शोधायचं होतं. माझा पत्ता आणि "आपलं घर" या संस्थेबद्दल तिला कोणी सांगितलं असणार? ती माझ्यापर्यन्त कशी आणि कुठून पोहचली? हिच्या आयुष्यात नक्की काय घडल असेल? गंधालीबद्दल कळल्यावर एक क्षण खरं तर राग आला, क्षणातच तो विरुनही गेला. हे कोडं आता सोडवायलाच हवं, या निर्धारानं मी उठली. स्तब्ध आणि विचारात हरवलेल्या अभिरामला हाक मारली तर दचकत अभिरामने माझ्याकडे बघितलं.

"गंधाली" नावाचं कोडं सोडवायलाच हवं."

"हम्म ...." अभिराम

"चिन्मय, तन्मय, अवि कुठे असतात, त्यांचे पत्ते किंवा फोन नंबर काही आहे का?" अभिराम

"नाही रे, मी पुण्याला आले. सुरवातीला भेटलो आम्ही. त्या आठवणी, ती मस्ती, त्या गप्पा खुप रंगायच्या. पुढची भेट ठरवायचो.

मी पुण्यात असेपर्यंत गंधाली तिथे नव्हती रे. दादा अचानक गेला. मी आधी बारामतीहून शिक्षण पूर्ण केलं. नंतर मला इथे सणसवाडीला माईसाठी यावं लागलं.

हळुहळु सगळे आपापल्या आयुष्यात गुंतत गेले, मग्न झाले. ती भेटीची ओढ कमी होत गेली, मैत्रीतील ओलावा कोरडा होत गेला. भेटणं कमी झालं, नंतर मात्र सगळ्यांशीच संपर्क तुटत गेला. सर्वांचे व्याप वाढलेत, प्रत्येकाच्या आयुष्यात इतर लोकं ही आलीत आणि अमरावतीच्या ज्ञानमाता हायस्कूलच्या पटांगणात विणलेले ते मैत्रीचे गोफ इथे आल्यावर सैल झाले. पुण्यात गेले असता एकदा अवि भेटला होता, नेहमीप्रमाणे घाईत होता. त्यामुळे औपचारिक बोलणं झालं. इतर विषयांवर फार काही बोलताच आलं नाही."

"ऋतु, तेव्हा वाटलं नव्हतं असं काही घडेल आणि जीवाभावाची मैत्री एका वळणावर अशी शोधावी लागेल. ते वेडे स्वप्न, त्यास वेड्या आशा, सर्व कुठे, कसं अन केव्हा हरवलं कळलच नाही. अनाहूतपणे आमच्या सर्वांमध्ये परकेपणाची दरी तयार झाली. एकमेकांची रोजनिशी ठेवणारे आपण आज कोण कुठे काय करतात काहीच माहित नाही." अभिराम

"अभि, ऋतु या, प्रसाद घ्या रे पोरांनो." माईंनी तुळशीपुढे उदबत्ती ओवाळत म्हंटलं.

"अभिराम, कसा आहेस बाळा? तू भारतात येणार कळलं होतं, वेळात वेळ काढून इकडे आलास ते बरं झालं. सांगलीच्या एका संस्थेचे लोकं आले होते, त्यांच काम उरकून मगच तुझ्याशी गप्पा करव्या म्हटंलं." माई

"मी मजेत माई, तुझी तब्येत बरी दिसत नाही. दम्याचा त्रास काही कमी झाला का?" अभिराम

"तो काय, मी जाईन तेव्हाच जाणार, ते असो. तुझे संशोधन कुठपर्यंत पोहचलं? डॉक्टरेट केव्हा मिळणार?" माई

"माई, त्याला अवकाश आहे. कमीतकमी चार वर्ष चालेल माझं संशोधन. त्याचंच काम होतं म्हणून आलो भारतात." अभिराम

"मुक्काम आहे ना रे, की लगेचच जाणार?" मी विचारले

"आहे दिड दोन महिने. इथलं काम आटोपलं की जाईन." अभिराम

माई अभिरामशी बोलण्यात मग्न होत्या. अनेकांचे हालहवाल, खुशाली, कोण कुठे असतो, कोणाचे लग्न झालं, कोणाचं ठरलं...

"माई ग, तुमच्या गप्पा झाल्या असतील तर कामाचं बोलू का आम्ही? मी जरा चिडून विचारलं. गंधालीबद्दल बोलायला मी अधीर झाले होते.

"हो ग हो... स्वयंपाकघर बोलवतय मला" माई पायरीचा आधार घेत उठत म्हणाल्या.

माई निघताच माझ्या चेहऱ्यावरचे अधीर भाव टिपत अभिने थेट गंधालीच्या विषय काढला.

"गंधालीबद्दल मला बरच काही माहिती आहे. मध्यंतरी मी पी.जी साठी आय.आय.पी.आर. बंगलोरला जायच्या आधी रांजणवाडीला गेलो होतो. राधाक्काची भेट घेतली होती मी. खरं तर अवि भेटला. भेटला काय दिसला. गंधालीबद्दल मी विचारणार होतो. तेव्हा कळलं की गंधाली त्याच्यासोबत नाही ते. तो पर्यंत मी ती त्याच्यासोबतच असेल या भ्रमात होतो. तो मला न भेटताच निघून गेला. मी तेव्हापासून हिचा शोध घेतोय. आधी सांग इथे ती नेमकी कधी, कशी केव्हा आली. हे कळलं तर मला काही तरी लिंक लागेल ऋतु." अभि

साधारण साडे तीन वर्षे झाली ती इथे येऊन, ती पुण्याहून आली, एफ.टी.आय.आय.चे अधिकारी आले होते तिला सोडायला. त्यांचे डिटेल्स मिळतील आपल्याला रेकॉर्डसमध्ये, तेव्हा नेमकी मी नव्हते रे इथे. दिक्षित काकू होत्या, त्यांनी रेकॉर्डवर जी माहिती भरली तेवढीच काय माहिती आहे आम्हाला. ना तिला कोणी भेटायला येत ना ही कुठे जाते, त्यात ती बोलू शकत नाही, लिहिता येतं, साडे तीन वर्षांपासून मी हे अबोल कोडं सोडवायचा प्रयत्न करत आहे. मी एका दमात त्याला माहिती पुरवली.

चिन्मय-तन्मयची ती बहिण आहे ऐकल्यावर मला हायसं वाटत होतं. राधाक्काला फोनकरुन सांगायला हवं होतं कि त्यांची गंधाली सुखरुप आहे. हा विचार येताच मी एक क्षण थबकली. असं काय घडलं कि एक आदर्श कुटुंब म्हणून अख्ख्या रांजणवाडीत प्रसिद्द असलेल्या या जगतापांची लाडकी लेक एका संस्थेत रहात आहे आणि कोणाला माहिती नाही.

अभिरामची तगमग मला कळत होती.

"मला वाटलं अवि नक्की लग्न करेल तिच्याशी." मी विचारलं

"अवि? नाही ग ऋतु. आम्ही चेष्टा करायचो त्याची. तो फारसा सिरियस नाही वाटला तिच्याबद्दल, कधीच नाही आणि तो सिरियस नाही बघून नंतर आम्ही चिडवायचं ही बंद केलं." अभिराम

"आणि तू .....तुझ्या आयुष्यात केव्हा आली ती. " हा प्रश्न विचारताच अभिने विषयांतर केल्याचं जाणवलं, हे कोडं सोडवायाचा धागा सापडला या नादात मीही अभिला परत प्रश्न विचारला नाही.

"गंधाली कुठे आहे, मंगल?" मी ओसरीवरून उठत आवाज दिला. तसा अभिरामही उठला, दोघांच्या मनात एकच विचार इथे कशी काय आली.

"स्वयंपाकघरात असेल नाहीतर गच्चीवर कपड्यांच्या घड्या घालत असेल" मंगल

स्वयंपाकघरात नाही बघून दोघं गच्चीवर गेलो तर गंधाली एका कोपऱ्यात रडत बसली होती. अभिरामला बघताच ती धावत येऊन त्याच्या कुशीत शिरली. अनेक वर्षांपासून दाटलेल्या अश्रुंना आज तिनं मोकळ केलं होतं.

तिचे उमाळे थांबत नव्हते. अभिने तिला थोपटत बाजूला केलं. हे मात्र मला अनपेक्षित होतं. माझं एक कोडं सुटलं असलं तरी दुसरं पुढे तयार होतचं, अभिराम, माझा मावसभाऊ असला तरी आमच्यात बहिणभावाच्या नात्यापेक्षा मैत्री अधिक होती. गंधाली, त्याच्या आयुष्यात केव्हा आली, त्यांच्यातील नात्याची वीण, हे बंध हे सारं काही त्या क्षणी माझ्या जाणीवकक्षेच्या पलीकडचं होतं.

तेवढ्यात माईंनी निरोप पाठवला. आम्ही तिघंही माईंच्या खोलीत आलो. गंधालीचे उमाळे कमी होत नव्हते. माईंना बघून तिला आणखिनच रडू येत होतं.

ती शांत होईपर्यंत थोडा वेळ लागला. सारेच स्तब्ध होते.

"ये गंधाली........" मायेनी तिला जवळ घेत माईंनी त्या विलक्षण शांततेची तीव्रता कमी केली खरी पण ते अबोल पोर व्यक्त कसं होणार? याचाच विचार आम्ही तिघही करत होतो.

>>>>>>>><<<<<<<<

"दिक्षित काकू, गेल्या तीन ते चार वर्षांपूर्वीचे रेकॉर्ड्स दाखवता का? ऑफिसमध्ये टेबलावरचा पसारा आवरत मी म्हणाले. रेकॉर्ड्सवरुन गंधालीची माहिती काढणं तसं सोप्प होतं. तिच्या आयुष्यात असं काय घडलयं की तिला आमच्या आश्रमात येऊन रहावं लागलं, या विचारांनी डोक्याला मुंग्या आल्या होत्या, त्यात अभिराम व गंधाली या दोघांमध्ये नक्की काय नातं? ही दोघं केव्हा इतक्या जवळ केव्हा आली ? काहीच कळत नव्हतं, नेमकी कोणत्या टोकानं हा गुंता सोडवावा हे कळत नव्हतं.

"घे गंधालीची फाईल." त्या भयाण शांततेचा भंग दिक्षीत काकूंनी केला.

फाईलमध्ये तिचे मेडिकल रिपोर्ट, इतर तत्सम माहिती होती. कौटुंबिक माहितीचा रकाणा रिकामा होता.

ज्यांनी तिला या आश्रमात सोडलं त्यांची माहिती होती. डॉ.प्रथमेश दांडेकर आणि अनिरुद्ध हसबनिस या एफ.टी.आय. आयच्या दोन अधिकाऱ्यांची नावं होती.

त्यांच्याशी संपर्क साधून गंधालीबद्दल काही माहिती मिळते का बघायला हवं. माझ्या मनात विचार आला.

"अवि एफ.टी.आयमध्येच कामाला होता. काहीतरी माहिती निश्चित मिळेल" अभि

"उद्या सकाळी फोन करुन बघते."

आधी मला गंधाली-अभि-अवि या त्रिकूटाचे कोडं सोडवायचं होतं. नंतर ज्यांना संपर्क साधता येईल त्यांच्याकडून माहिती घेऊन हे कोडं सोडवायचा प्रयत्न करायचा होता.

या तिघांमधे नक्की काहितरी घडलं असावं आणि त्या कारणामुळेच गंधाली घर सोडून या संस्थेत आली असावी. माझं स्वताशीच तर्क साधणं सुरु होते. आधी अभिला गाठायला हवं. त्यानं बरंच काही सांगितलं असलं तरी सगळंच सांगितलं नव्हतं. नेमकं तेच मला जाणून घ्यायचं होतं.

अवि, कुठे असेल? सचिन, स्वप्ना कुठे असतील? माझ्या मनात प्रश्नांचं काहूर दाटलं होतं.

आता गंधालीला माझ्याबद्दल, या संस्थेबद्दल कोणी माहिती दिली असेल हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतच होता. याचे उत्तर माझ्या दृष्टीने खुप महत्वाचे होते.

गंधालीला विचारुन बघू का? मनात विचार आला खरा. पण सांगायचं असतं तर तिने आधीच सांगितलं असतं.

अभि, जरा डिटेलमधे सांगशील का?

काय? अभि

तू, गंधाली आणि अवि, तिघांबद्दल. सगळं ऐकायच आहे मला.

आत्तापर्यन्त मला तुमच्या तिघात खूप छान आणि जिवापाड मैत्री होती एवढंच काय ते कळलं.

मी तुमच्या मैत्रीचा हा गोफ कुठे आणि कसा निखळला हे जाणायचा प्रयत्न करत आहे. कदाचित याच्यातच काही प्रश्नांची उत्तरे दडली असतील.

"गंधालीला तुझ्या संस्थेबद्दल माझ्याकडूनच कळलं असणार. तात्या गेले तेव्हा ती आणि अवि मला स्टेशनवर सोडायला आले होते.

तेव्हा मी अविला तुम्हाला हे कळवायला सांगितलं होतं. तेंव्हाच बारामतीच्या घराचा आणि सणसवाडीच्या या संस्थेचा पत्ता आणि फोन नंबर दिला होता." अभि

"तसंही तुझ्याबद्दल, माईबद्दल आणि या संस्थेबद्दल अविला, सचिनला, स्वप्ना, परेश, चिन्मय, तन्मय सर्वांनाच ठाऊक होतं ग." अभि

थांब तुला सांगतोच सगळं.

“अवि, गंधाली, रांजणवाडीत शेजारीशेजारी रहात होते. बार्शीटाकळी ते अमरावती रोज प्रवास शक्य नसल्यानं शिक्षणासाठी चिन्मय आणि तन्मय अमरावतीला आपल्या आजोळी रहात होते. आपल्या घराच्या मागे एक मारोती मंदीर आहे न, तिथेच पलीकडे त्यांचं आजोळ होतं. नंतर पुढच्या शिक्षणासाठी ते पुण्यात आले. पाठेपाठ अवि कोरिओग्राफी शिकण्यासाठी पुण्यात आला. जगताप काका आणि राधाक्काने बघितलं पुण्यात गंधालीसारख्या हुशार मुलीला शिकण्याची आणि जीवनाच्या पुढच्या प्रवासात तिला गरजेचं ते मिळवणं शक्य आहे. यासाठी त्यांना कोणीतरी मदत ही केली. त्यांनी एका नातेवाईंकाचे घर भाड्यानं घेऊन तिघांच्या रहाण्याची व्यवस्था केली. अविला एफ. टी.आय.आय मध्ये प्रवेश मिळाला. तो होस्टेलमध्ये रहात होता. मी एस.पी कॉलेजला ऍडमिशन घेतली होती. चिन्मय व तन्मय सी.ओ.इत होते. रोज आम्ही गुडलक हॉटेलजवळ एका झाडाखाली रोज भेटायचो. तो आमचा मैत्री कट्टा. चिन्मय - तन्मय या दोघांनी पुढच्या शिक्षणासाठी पुणं सोडलं आणि गंधाली घर सोडून होस्टेलवर राहायला आली. होस्टेलवर गेल्यानंतर कळत नकळत अविचा आणि तिचा संपर्क वाढत गेला.

अविमुळे गंधालीला एफ. टी.आय.आय. मधे अनेक जण ओळखत होते. अवि, तुला माहिती आहे एक नंबर अवलिया आहे तो. शुटिंगनिमित्त सतत बाहेर असायचा...... अभि बोलत होता, मी ऐकत होते.....किती वेळ लोटला ठाऊक नाही.

नेहमीप्रमाणे नेगी चचा फुल्लारीचं गाण गुणगुणत होते. त्यांच्या गढवालमध्ये चेतमासात अर्थात एप्रिलच्या सुमारास सगळीकडे अनेकप्रकारची फुलं उमलतात. ते गावातल्या पोरी वेचून आणतात, त्या पोरींचा देवी म्हणून सन्मान केला जातो. गंधाली आल्यापासून आमची बाग कायम बहरलेली. म्हणूनच ते तिला फुल्लारी म्हणत असावे.

## २.

### अभिराम

**गं**धाली इमोशनली माझ्यावर किती अवलंबून होती हे मला माहिती होतं. खरंच मी तिच्याकडे फक्त एक केस म्हणून बघत होतो. तिच्या आजच्या या परिस्थितीला, दु:खाला, किती ठऊक नसलं तरी मी जवाबदार होतोच.

आता पुढे काय? काय झालं असेल? अवि कुठे असेल? त्याला गंधालीबद्दल माहिती असेल? राधाक्क्क कशी असेल? प्रश्न आणि प्रश्न, प्रश्नांच्या गुंत्यात मी पुरता अडकलो होतो.

"ऋतु, प्रश्नांचा हा गुंता सोडवायलाच हवा ग."

"हो अभि, आताशा काही धागे दोरे सापडलेत." ऋतु

गंधालीतील माझी इनव्हॉलवमेंट ऋतुजा शोधायचा प्रयत्न करत होती. तिला आता सर्व सांगायलाच हवं.

“ऋतु, मैत्री कट्ट्यावरची आमची मैत्री रुजत होती. मी एस.पी. कॉलेजला असतानाची गोष्ट आहे. अविसोबत ती अंकुर विद्यामंदिरात जात होती. नंतर त्यांच्यासोबत मी

ही जाऊ लागलो. अवि तिच्यात गुंतला असला तरी किती हे कळत नव्हतं, त्याने तिला कधी प्रपोज केलं नाही ग आणि गंधालीच्या वागण्यातही त्याच्याबद्दल ओढ असेल असं वाटत नव्हतं, आमच्या तिघांची मैत्री एस.पी कॉलेज ते एफ.सी. रोड या रोजच्या प्रवासात फुलत गेली.... बहरत गेली. अवि नसला तर मी व ती दोघं अंकुर विद्यामंदिरात जायचो. ती तिथे शिकायची नंतर ती हळु हळु शिकवायला लागली. साइन लॅंग्वेज मी तिच्याच सहवासात शिकलो.

हा रोजचा अबोल प्रवास त्यात मी गंधालीला जाणून घ्यायचा प्रयत्न करत होतो. तिचे बोलके डोळे, मी काय शोधायचो कळत नसलं तरी ते काही तरी माझ्याशी बोलतात असा भास होत असे. अवि एफ.टी.आय.आयच्या हॉस्टेलवर रहायचा. गंधाली तिथेच जवळच्या वझेंच्या लेडीज हॉस्टेलमध्ये रहात होती. मी डेक्कनला मित्रासोबत एका खोलीत रहायचो.

कॉलेजमध्ये सायकॉलॉजीवर खुप वाचायचो....खूप चर्चा करायचो...आणि एक दिवस जॉन वाटसन आणि जेम्स ॲग्रेला यांचे बिहेवियरिझमबद्दल वाचलं आणि मग डोक्यात तोच विचार, ती उत्सुकता....ती चर्चा....ते प्रयोग,....मग मुकबधीर मुलांच्या बिहेवियरिझमबद्दल विचार करता करता गंधालीकडे मी त्याच दृष्टीने बघू लागलो. "गंधाली व तिचं बिहेवियर..." खूप दिवस डोक्यात होतं ते माझ्या....नकळत तिच्याशी संवाद वाढला, ती मला रिस्पॉन्स देत होती आणि मी अनुमान काढत होतो. गंधाली.....हुशार होती, साइन लॅंग्वेज खूप लवकर शिकली. नंतर ती तिच्या सारख्या मुलांना शिकवत होती. सगळं व्यवस्थित सुरु होतं. आमच्या त्या भेटी, तिच्या डोळयातून ती काय सांगतेय हे मी नकळत शोधू लागलो. सांकेतिक भाषेत गप्पा होत होत्या. हळू हळू त्या वाढत गेल्या आणि आवडत गेल्या. ती अविला टाळत होती....मला कळत होतं. अविही शूटिंगमध्ये बिझी होत गेला. अवि नसला तरी आम्ही भेटत होतो. त्या निशब्द गप्पा..... आजही आठवतात.

एडवर्ड टोलमन वाचल्यावर एकदा माझ्या मनात आलं की मी गंधाली सोबत "ट्रायल ॲन्ड एरर" चा प्रयोग करतोय का? त्याक्षणी मलाच माझी लाज वाटली होती. खरंच सायकोलॉजीचा अभ्यास करता करता मी तिला एक्सप्रिमेंटल म्हणून गृहीत धरलं होतं का? असे विचार माझ्या मनात येत होते. खरंतर आम्हा दोघांना एकमेकांची कंपनी आवडत होती. तिला भेटण्यासाठी मी आधी निमित्त शोधत होतो, नंतर हळुहळु माझा भिडस्त स्वभाव बिनधास्त झाला, नंतर तिला भेटण्यासाठी कारणांची गरज भासत नव्हती. रोज भेटीची ओढ वाढत होती. प्रत्येक भेटीत ती मला नव्याने उमगत होती. तिच्या सांकेतिक भाषेच्या पलीकडचं, तिच्या मनातलं मला मात्र उमगलंच नाही ग ऋतु. गंधाली धीट होती. तिने तिच्या संवादातील अडचणींवर मात केली होती. तिचा आत्मविश्वास जसा जसा वाढत होता, तसा तसा तिच्या स्वभावातील कणखरपणा वाढत होता. आजुबाजुचे लोकं, त्यांच्या नजरा, त्यांच्या स्वभावाचा तिला उलगडा होत असतांना, ती तिला नको असलेल्या व्यक्तींना टाळत होती. तसं तिला व्यवहारज्ञान फार लवकर आलं. हुशार असल्यामुळे, स्वताला नेमकं काय करायचं आणि त्यासाठी लागणारे कष्ट घ्यायची तिची तयारी होती. पुढच्या शिक्षणासाठी तसच पुण्यात रहाण्यासाठी तिला पैशाची नितांत गरज होती. अविवर अवलंबून रहाणं तिला फारसं आवडत नव्हतं. तिचा नाइलाज होता. स्वत:च्या पायावर उभं रहाण्याची तिची धडपड मला कळत होती. मी तिच्याकडे एक्सप्रिमेंटल दृष्टीने बघत असल्यामुळे ती काय करु शकते किंवा काय नाही याचा अनेकदा विचार केला. खरं सांगु तिला मदत मी वेळ पडल्यावर पैसे देऊन केली. स्वावलंबी होण्यासाठी तिची तीच धडपड करत होती.

अशातच एक दिवस अंकुरमध्ये कुठल्याशा संस्थेनी खुप कपडे आणून दिले. काही कपडे उपयोगात आणले गेले, काही उरले होते. त्यांचे नेमके काय करयचं या विचारात संस्थातील लोकं

असतांनाच, दिवाकर आजींनी गोधड्या करण्याचा विचार मांडला. बघता बघता गंधाली आणि तिच्यासारख्यांना गोधड्याशिवण्याचा वर्ग एक आठवडा चालला. एक चांगला दिवस बघून गोधळ्या शिवण्यास सुरवात झाली.

त्या दिवशी गंधाली खुप खुश होती. तिला गोधडी शिवण्याचे २००रुपये मिळाले होते. आम्ही सारसबागेत तळ्यातल्या गणपतीच दर्शन घेतलं. ती खुप खुश असली तरी तेवढीच गंभीरही होती. जणु काही निर्णय घ्यायचा होता पण घेऊ शकत नव्हती. ऋतु, तिची ही मनस्थिती अविनं अचुक हेरली. आजही आश्चर्य वाटतं मला तिची ही तगमग का कळली नाही. कदाचित तिला माझ्याकडून काही अपेक्षा असतीलही, मला हे कसं कळलं नाही. किती मोठी चुक केली मी. अविनं आधी मदतीचा हात पुढे केला आणि नंतर मी.

दुसऱ्या दिवशी अंकुरच्या दिवेकर आजींना गाठलं. त्यांना गंधालीनं आणि आम्ही व्यवसायाचा विचार सांगितला. प्रश्न भांडवलाचा होता, अर्थात खुप गुंतवणुक करण्यापेक्षा आधी दहा बारा सेट करुन जवळपासच्या दुकानात विक्रीला ठेवून बघायचं, तसंच संस्थेशी निगडीत लोकांना सांगायचं आणि प्रतिसाद मिळाला की मग पुढचं काय ते ठरवणार होतो. दिवेकर आजी अनुभवी होत्या, त्यांच म्हणणं ही रास्त होतं. मग मी आणि अविनं ५००रुपये प्रत्येकी जमवले. यात सचिनने पण खुप मदत केली. त्यानेही २०००रुपये जमा करुन दिले शिवाय त्याच्या ओळखीमुळे शिवणकामासाठी लागणाऱ्या साहित्यातही बरीच सुट मिळाली. अंकुर संस्थेतील दिघेकाकांकडची शिलाईमशीन तात्पुरती वापरायला मिळाली. अशा प्रकारे गंधालीचा स्वतंत्र व्यवसाय सुरु झाला. तान्ह्या बाळांसाठी गादी, लोड, दुपटं, झबलं, असे सेट करुन ओळखीच्या दुकानदारांकडे ठेवले, काही संस्थेतच विकल्या गेले. आठवतंय मला पहिल्या ३० सेट मागे

गंधालीला १०००रुपयांचा नफा झाला. आपण काही करु शकतो, त्या स्वावलंबनाच्या अभिमानाची चमक मी तिच्या डोळयात पाहिली होती.

खरं सांगू का, ती माझ्याबद्दल काय विचार करत असेल हा विचार अधूनमधून यायचा माझ्या मनात. मग कुठलं तरी काही तरी वाचलेलं आठवलं की तो विचार बाजूला पडायचा. हळुहळु सायकॉलॉजीबद्दल माझं वाचन वाढत गेलं, प्रयोग करण्याची उत्सुकता आवरत नव्हती. तिचा स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न, वाढता आत्मविश्वास, स्वावलंबनासोबत वाढलेली जिद्द, चिकाटी, याची तुलना आणि अभ्यास करता करता, तिचा छोट्या छोट्या गोष्टीतला आनंद त्यात सहभागी होणं मी टाळलं, तिचं कौतुक करायचं सोडून मी कुठली थेअरी, हेच शोधत बसलो.

बी.एफ स्कीनरच्या "वॉल्डन टू" कादंबरीने तर मला वेडच लावलं होतं. ती वाचल्यावरच मी ठरवलं होतं या क्षेत्रात काहीतरी भन्नाट करायचं ते. या नादात मी गंधालीचं मात्र गिनीपिग केलं. मी नेमकी इथेच चुकलो. हे आज कळतय.....इतक्या वर्षांनी. काहीही न बोलता ती मला खूप काही सांगत होती. ते मी जाणून घ्यायचा प्रयत्न केला नाही. मला हवं ते समजलो.....तिला... गंधालीला समजून घेता आलंच नाही.

सचिनला फोनकरुन कळवलं होतं. मॅसेजही केला. स्वप्नाला कळेलच. अवि भेटला तर बरं होईल. गंधालीचा गुंता लवकर सोडवता येईल.

"ऋतु, मी तिला असं अर्ध्यावाटेवर सोडायला नको होतं. का मला तिच्या भावना जाणून घेता आल्या नाही? काय अर्थ माझ्या या संशोधनाचा? गिनीपिग केला मी तिचा."

"अभि, त्रागा करु नको रे. सापडेल मार्ग, होईल व्यवस्थित सगळं." ऋतु

पूर्ववत होईल सगळं? या प्रश्नाचे उत्तर सध्यातरी कोणाकडेच नव्हतं.

“ऋतु, मला कसं लक्षात आलं नाही. गंधाली ... माझी वाट बघून शिणली असेल. कसं तिनं स्वत:ला सवरलं असेल?”

विचार केला तरी अंगावर काटा येतो.

माझं असं बोलणं ऐकून ऋतु आवाक झाली. माझ्या डोळयातलं पाणी बघून तिला बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला असावा.

मला तिला अजून संभ्रमात टाकायचं नव्हतं.

“ऋतु, मी गंधाली आणि अवि तिघांची मैत्री, मी कळत नकळत तिच्यात गुंतलो. अविला लक्षात आलं. आमच्या इतक्या वर्षांच्या सहवासात अविने तिच्याबद्दल त्याच्या भावना कधीही व्यक्त केल्या नाही.

मी सांगितलं न तुला, मी माझ्या सोयीने अर्थ लावत गेलो. दुसऱ्यांच्या भावनांचा विचारच केला नाही. आधी मला वाटत होतं की अवि तिच्यात गुंतला नसावा. तो व्यक्त झाला नाही म्हणून मी असा अर्थ काढला.

मी सायकॉलॉजीचा विद्यार्थी असूनही मला माझ्याच लोकांचं मन कळलं नाही. काय उपयोग या शिक्षणाचा?

"ऋतु, माझा आणि गंधालीचा तो निशब्द संवाद रंगत होता. बहरत होता. तिची जिद्द तिच्या यशाच गमक होतं. गोधडी आणि लहान मुलांच्या कपडे शिवण्याचा तिचा प्रयोग यशस्वी झाला. तिचा आत्मविश्वास मला अभ्यासाला प्रेरीत करत होता. हळुहळु तिचा छान जम बसला. अवि शूटिंगनिमित्त सतत फिरस्तीवर असायचा. हळुहळु तो आमच्यापासून दूरावत गेला. मनमोकळेपणानं बोलणारा अवि आता शांत झाला होता. आज वाटत आहे तो बहुधा आपणहून या अनामिक नात्यापासून दूर झाला असावा. तो पुण्यात आला की भेट होत असे. मात्र आमाच्यातल्या मैत्रीला कुठेतरी तडा गेला होता."

"सचिन, स्वप्ना सर्वांनी जोर दिला की तिला प्रपोज कर. मी तिला प्रपोज वैगरे केलं नव्हतं. मी तिला आवडत होतो इतकं नक्की. आमची मैत्री प्रेमात बदलली. शिक्षण संपेपर्यन्त कसलाच विचार करायचा नाही असं आम्ही ठरवलं होतं.

मी आठवड्यातून तीन दिवस डॉ. ठाकरेंकडे कन्सलटंट म्हणून जात होतो. तिथेही अभ्यासाला आणि प्रयोगाला खूप वाव होता.

माझं वाचन, अभ्यास, प्रयोग सर्वांचा अवाका वाढत होता. गंधालीला मी काही बाबतीत गृहीत धरून वागत होतो. खरंच तिला काय वाटत असेल, काही सांगायच असेल किंवा माझी तिला कधी गरज भासत असेल मी कधीच विचार केला नाही ग ऋतु.

तिचं व्यवस्थित सुरु आहे आणि आम्ही जे भेटतो...तेवढ पुरेसं आहे....तिला आणि मलाही. हा माझा समज, याचीच मी ढाल करुन तिच्याशी वागत होतो, हे आज उमगतय मला."

"आज वाटत आहे उणीव माझ्यातच होती. ऐकु येत असून तिचे निशब्द हुंदके ऐकू शकलो नाही. वादळ होऊन आलेला तो दिवस......आजही आठवला की अंगावर काटे येतात. राग-मत्सर काय होतं, जे होतं त्यामुळे आम्हा तिघांच्या आयुष्य उध्वस्त झालं हे इतकं नक्की."

३

## सचिन

अभिरामचा मॅसेज वाचून एक क्षण मी दचकलोच. थ्री इडियट्समधे सुरवातीला रॅन्चोबद्दल बातमी ऐकून जी अवस्था फरहान आणि राजूची झाली होती तीच सध्या माझी होती.

गंधाली, तिचा शोध घेऊन थकलो होतो, चक्क ती आज सापडली होती. गंधाली आमच्या आयुष्यातून अचानक निघून गेली, कुठे गेली, कशी गेली, का गेली, खूप शोधण्याचा प्रयत्न केला पण काहीच तपास लागला नव्हता. आणि आज अचानक अभिचा हा मॅसेज. स्वप्नाला कळवायला हवं.

"हॅलो स्वप्ना ....गंधाली सापडली"

"कुणी सांगितलं, कुठे आहे ती, कशी आहे, अवि आणि अभिला माहित आहे का?" स्वप्ना

"स्वप्ना, रॅपिड फायर थांबवशिल तर सांगतो तुला."

"अरे यार, मी अशी अवघडलेली, डॉक्टरांनी बेड रेस्ट सांगितला आहे, येतोस का घरी? मग बोलू आपण." स्वप्ना

"तुला अभिचा मॅसेज नाही आला का स्वप्ना?"

"नाही रे, माझा जुना फोन नंबर असेल त्याच्याकडे." स्वप्ना

"तु माहेरी आहेस न, आईकडे, वारजेला, येतो दुपारी. बोर्डाच्या ऑफिसमध्ये काम आहे, उरकून येतो."

"तब्येत कशी ग स्वप्ना?" गाडीची किल्ली टेबलवर ठेवत मी विचारलं.

"आणि अशावेळेस मोहन तुला सोडून कुठे गेला."

"मी बरी आहे रे, जर्मनीला गेलाय तो. येईल पुढच्या आठवड्यात. तू आधी गंधाली बद्दल सांग" स्वप्ना

"स्वप्ना, गंधाली ऋतुजाच्या "आपलं घर" या संस्थेत आहे, आणि हो अभिचाच मॅसेज आला होता."

"काय सांगतोस" स्वप्ना

आम्ही दोघंही सुन्न झालो होतो. आज असं अचानक तिच्याबद्दल कळलं. आनंद आणि राग या दोन्ही संमिश्र भावना आम्हाला व्यक्त करता येत नव्हत्या. जीवाभावाची मैत्रीण अशी अचानक आयुष्यात येते काय, अचानक निघून काय जाते आणि इतक्या वर्षांनी परत येते काय? त्या क्षणी काहीच सुचत नव्हतं. चित्रपटाप्रमाणे सगळे प्रसंग डोळ्यापुढून सरकत होते. अविसोबत भेटलेली अबोल गंधाली, भेदरलेल्या डोळ्यांनी आम्हा सर्वांकडे बघणारी, हळुहळु खुलणारी गंधाली, नंतर जीवाभावाची मैत्रीण झालेली गंधाली......

"अविला ठाऊक आहे का रे?" स्वप्ना

"नाही ग, अभिरामनी अविचा शोध घ्यायला सांगितला आहे."

"तुला माहिती आहे का त्याच्याबद्दल काही? तुझं मध्यंतरी बोलणं झालं का त्याच्याशी?"

"स्वप्ना ए स्वप्ना, कुठे हरवलीस? अग मी तुझ्याशी बोलतोय."

"हम्म... तेच. तेच तर आठवतेय रे. आम्ही भेटलो तेव्हा तो कुठल्यातरी शुटिंगमध्ये बिझी होता. तो काय शुटिंगनिमित्त सतत फिरतीवर असायचा. आज इथे तर उद्या तिथे."

"हो, मनोहर मंगल कार्यालयात भेटला होता तो, सिद्धेशच्या लग्नाला आला होता. अरे, कित्येक वर्ष झालेत त्याला. माझा फोन हरवला त्यात सगळेच फोन नंबर गेलेत रे, म्हणून तर फोन नंबर बदलला न रे माझा." स्वप्ना

"सोशल मिडियावर शोधुया त्याला" स्वप्ना

"हो अभिचं तेच म्हणणं आहे, "सणसवाडीला इंटरनेट खुप स्लो आहे, तुम्ही सोशल मिडियावर शोधा, मी चिन्मय-तन्मयशी संपर्क करतो, असं म्हणाला आहे तो."

"आई चहा कर ग आमच्या दोघांचा" स्वप्ना

"चल, लॅपटॉपवर ट्राय करु. लिंकडिन, फेसबुक, ट्विटर बघु कुठे सापडतो तो. खरं तर फेसबुकवर फ्रेंड आहे माझा तो. तो फारसा वापरत नसावा कारण त्यानं कधीच कुठली पोस्ट टाकल्याचं मला आठवत नाही. तरी प्रोफाईल चेक करु या, सापडेल आपल्याला" स्वप्ना

"अविचा एक मेल आयडी आहे प्रोफाईलवर, मेल पोस्ट करुन ठेवते आणि फोन नंबर देऊन ठेवते, वाचल्यावर कदाचित कॉल करेल तो आपल्याला." स्वप्ना

"तुला आठवतय का स्वप्ना, पहिल्यांदा गंधाली आणि आपली भेट सिहंगडावर झाली होती. असाच वाफाळलेला चहा, गडावरचा सुसाट वारा, त्यात गंधालीची उडालेली धांदल."

"हो रे, ती तिच्या आयुष्यातली पहिली ट्रिप. अवि तिला जबरदस्ती घेऊन आला होता. आधी बावरली होती, नंतर छान मैत्री झाली आपली. आता कशी असेल रे ती? आपल्याला विसरली नसेल ना? स्वप्ना

"छे, विसरणे शक्य नाही, काय झालं असं की कोणालाच काहीही न सांगता ती सगळ्यांच्या आयुष्यातून अचानक निघून गेली. हा घुम्या अविही काही बोलला नाही. तो ही कळत नकळत आपल्यापासून दूर निघून गेला."

"गंधालीने शिवलेले बाळंतविडे, पिशव्या, पर्सेस, आपण कित्येक प्रदर्शनात कित्ती स्टॉल लावले ना रे." स्वप्ना

"खरं तर छान चाललं होतं सगळं. तिची जिद्द, धडपड आजही आठवते यार. खरं काय ते ती भेटल्यावरच कळेल."

"तू काहीही म्हण पण अवि गुंतला होता तिच्यात." स्वप्ना

" ........ आणि ती अभीत"

"तुला आठवतय स्वप्ना ... अविचा एकदा शूटिंग करतांना ॲक्सिडेन्ट झाला होता. त्याच्या पायावर ट्रॉली पडली होती. तो ससूनमध्ये ॲडमिट होता.

त्याच्या पायाला चांगलाच मार लागला होता. वाटलं नव्हतं की त्याचा पाय वाचेल. केवढी घाबरली होती ती अविला दवाखान्यात बघून. गंधालीने खूप केलं त्याच्यासाठी. खरं तर तेव्हाच, हॉस्पिटलच्या त्या चकारा, तिला रोज आणणं-नेणं या सगळयातच आपली आणि तिची मैत्री अधिकच घट्ट झाली नाही का?

"खरं सांगायचं तर मला आधी तिची साइन लॅंग्वेज कळत नव्हती. नंतर हळु हळु ती कळायला लागली." स्वप्ना

"तिचा तो अबोल संवाद, डोळे खुप बोलके होते रे तिचे." स्वप्ना

"आजही वाटतं कदाचित तिला समजून घेण्यात आपण कुठे तरी चुकलो, स्वप्ना?."

"कदाचित तिची व्यक्त होण्याची पद्धत आपल्याला लक्षात आली नसावी"

"किंवा तिच्या मनात काय सुरु आहे हे आपल्याला कळलंच नाही." स्वप्ना

"सुरवातीला ती काय विचार करत असायची कळत नव्हतं. अधे मधे ती आपल्यात असून नसल्यासारखी वाटत होती. तिचं हे वागणं आपल्या लक्षात आलं नाही रे सचिन."

"एक लक्षात घे स्वप्ना, आपला परिवार, नातेवाइक, मित्र-मैत्रीणी, आपल्याला इतरही अनेक व्याप होते. आपण संपूर्ण लक्ष तिच्यावर कधीच केंद्रीत करु शकत नव्हतो. ते शक्य नव्हतं आपल्याला."

"तिच्यासाठी तिचं विश्व म्हणजे अभि, अवि तू आणि मी. तिचे आई बाबा चिन्मय तन्मय या सर्वांपासून ती दूर होती. अर्थातच तिच्या आपल्याकडून अधिक अपेक्षा असाव्यात आणि आपण तिथेच कुठेतरी कमी पडलो."

“कमी पडलो असं नको म्हणु रे सचिन, आपण आपल्याला जमेल ते केलं रे." स्वप्ना

"ही अपली बाजु, आपलं स्पष्टीकरण, तिच्या मनात काय होतं हे मात्र आपल्याला कळलं नाही, हे ही खरंच ना." सचिन

"का तिने कळु दिले नाही". स्वप्ना

"तू असं कसं म्हणू शकते स्वप्ना. तिला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. तिच्या संवादातील अडचणी तुला माहिती आहे. आणि माझ्या मते तरी तिने अडचणीं वर मात करुन आयुष्यात पाय रोवून उभं रहायचा प्रामाणिक प्रयत्न केला."

"धडपडी होती ती. मुख्य म्हणजे कष्ट करायची तिची तयारी होती. आपण बघितलय स्वप्ना"

"आयुष्यात काय करायला हवं हे वयाच्या मनाने तिला लवकर कळलं रे."

"तिचं ते टापटीप रहाणं, आपला व्यंग कुणाला न कळु देणं. तुला आठवतयं का सचिन, बोलता बोलता अवि एकदा बोलून गेला की ती पुण्यात आल्यावर धीट झाली नाही तर अगदी गोगलगाय होती." स्वप्ना

"आपणही पहिल्यांदा भेटलो तेव्हा बावरलीच होती ती थोडी."

"काही काळाने रुळल्यावरच ती तिची आवड निवड व्यक्त करायला लागली. नाही तर आपण जे म्हणू ते निमूटपणे ऐकायची.

"साधी भोळी होती रे ती. आणि म्हणूनच जरा जास्त काळजी वाटत होती." स्वप्ना

"गुडलकमधला इराणी चहा....मस्का पाव तिचं फेवरेट होतं

प्राजक्ताची फुलं खूप आवडायची तिला.."

"तुला आठवतय का सचिन. आपण एकदा इंजिनिअरिंग कॉलेज ग्राउंडवर पुस्तकांच्या प्रदर्शनात जात असतांना मोहित्यांच्या बंगल्यातला प्राजक्त वेचणारी गंधाली. ओंजळभर फुलं दिवसभर हुंगत होती." स्वप्ना

अंकुरच्या त्या परिसरात किती फुलझाडं लावली होती तिनं. गंधाली...परफेक्ट नाव आपण नेहमीच म्हणायचो.

"तू काहीही म्हण सचिन, अभिचं खूप प्रेम होतं रे तिच्यावर. तो चांगलाच गुंतला होता तिच्यात." स्वप्ना

"भेटल्यावरच कळेल की मैत्रीचा, प्रेमाचा हा गोफ कुठे आणि केव्हा आणि हो कसा निखळला."

"चल, अविचा काही मॅसेज आला तर कळव लगेच. ती सुखरुप आहे, यातच काय ते समाधान मानायचं. कळेल सगळं कळेल."

"आधी सारखं होईल सगळं?" स्वप्ना

"आशा तर करु शकतो. स्वप्ना, मैत्रीचं नातं हे अतूट असतं....हे कधीच विसरु नकोस."

४

**स्वप्ना**

**ख**रं तर गंधाली सापडण्याचा आनंद झाला होता. मन मात्र खजील झालं होतं. मी तिला त्या दिवशी असं एकटं सोडायला नको होतं. नेमकी मोहनच्या वडिलांची तब्येत बिघडली आणि मला तिला एकटीला सोडावं लागलं. काही अंशी का असेना, तिच्या आजच्या परिस्थितीला मीही कारणीभूत होतेच. आजही भेदरलेली ती गंधाली आठवली की अंगावर काटे येतात.

खरं तर अभिला कळवलं होतं, मी रिमांड होममधून निघाल्यावर तो पाच-दहा मिनिटात पोहचायला हवा होता.

अरे अभि, .....काय झालं होतं रे नक्की.... नंतर भेटलाही नाही.... काही बोललाही नाही.....अचानक निघून गेलास.

माझाही नाईलाज होता रे. मोहनचे वडिल सिरियस झाले, मला तिथून तडक निघावं लागलं. नंतर तडकाफडकी लग्न काय आणि या सगळया धावपळीत नेमकं माझं गंधालीकडे दुर्लक्ष झालं आणि तेव्हांच आमच्या मैत्रीचा घट्ट गोफ सैल झाला.

ती काही सांगू शकली नाही. निदान तू तरी बोलायच रे मला.

विचार करुन डोकं फुटायची वेळ आली होती.

आम्हा सर्वांच्या आयुष्यात वादळ होऊन आलेला तो दिवस........

गंधालीच्या होस्टेलवरुन अचानक आलेला तो फोन, मी व बाबा धावत पळत गेलो होतो. ते पोलीस, ओक्साबोक्शी रडणारी ....रक्ताने माखलेली गंधाली आणि निपचित पडलेली प्रणाली......

सगळंच सुन्न करणारं. वारंवार तीचं "मी नाही" खुणा करुन सांगणं, ती गर्दी, ती आरडा ओरड. पोलीसांनी घेतलेला गर्दीचा ताबा..... त्यात माझा तिचा हात सुटला.....पोलिसांनी ताब्यात घेतली होती तिला. तिचे केविलवाणी डोळे आठवले की मी आजही डोळे घट्ट मिटून घेते.

आम्हीही पोलिसांच्या मागोमाग ठाण्यावर गेलो.

अवि नेहमीप्रमाणेच शूटिंगला गेला होता, अभि पोहचायचा होता. सचिन लगेचच आला होता.

हॉस्टेलची वाडर्न रेखाताई परांजपेही त्यांना समजवून सांगत होत्या: गंधालीने काही नाही केलं, खुनाचं हत्यार, तो चाकु गंधालीच्या हातात होता आणि ती पोलिसांच्या ताब्यात होती हेच काय त्या क्षणी सत्य होतं.

संध्याकाळ झाली होती, महिला व बाल विकास कल्याण संस्थेचे अधिकारी ऑफिसमधून निघून गेले होते. सचिनने मित्रांसोबत आधी अंकूर संस्थेच्या अध्यक्षांची भेट घेतली.

झालेला प्रकार त्यांना परांजपे मॅडमने कळवला होता. त्यांच्या प्रयत्नांनी बाल एवं महिला कल्याण संस्थेचा एक अधिकारी पोलिस स्टेशनवर आला. संशयित आरोपी म्हणून पोलिसांनी गंधालीला कस्टडीमध्ये घेतलं होतं.

अभि आणि अवि दोघही अजून पोहचले नव्हते. मी, बाबा व सचिन ठाण्यात खूप वेळ त्यांची वाट बघत बसलो होतो. लवकरात लवकर वकीलांना गाठायला हवं होतं. बऱ्याच लीगल फॉरमॅलिटीस होत्या. काय कराव ते सुचत नव्हतं. गंधाली आधीच मुकबधीर त्यात जेमतेम सतरा अठरा वर्षाची असेल. सचिननी बराच वेळ वाट बघितली, शेवटी मित्राच्या ओळीखीने कदम वकिलांना ठाण्यावर बोलावलं. चिन्मय बॅंगलोरला होता तर तन्मय मुंबईला, दोघांनाही कळवलं. ते पोहचेपर्यंत हातावर हात बसून रहाणं शक्य नव्हतं.

पोलिसांचा पंचनामा, चौकशीचं चक्र सुरु झालं होतं.

मॅटर अपंग मुलीचा आणि त्यातही माइनर असल्यामुळे तुरुंगात न ठेवता कस्टडी बाल व महिला विकास संस्थेकडे सोपविण्यासाठी वकिलांची धडपड सुरु होती. बेल मिळायला वेळ लागणार होता.

अख्खी रात्र आम्ही पोलिसठाण्यात जागून काढली. गंधालीचे हुंदके आठवले की आजही शहारे येतात. दुसऱ्या दिवशी चिन्मय आणि तन्मय आले. रांजणवाडीवरुन राधाक्का आणि रमाकांतकाका पोहचले होते. गंधालीची कस्टडी रिमांड होमला देण्यात आली होती.

रोज आम्ही आळीपाळीने रिमांड होम कधी पोलिसठाण्याच्या चकरा टाकत होतो. केस कासवाच्या गतीने पुढे सरकत होती.

कसून चौकशी झाली. प्रणाली, सांगलीहून नोकरीसाठी पुण्यात आलेली एक हुशार आणि स्मार्ट मुलगी. एका पायाने अधु असलेली ती एका खासगी कंपनीत कामाला होती. गंधालीची रुममेट आणि छान मैत्रीण होती. तिचा खून होणं या गोष्टीवर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. मात्र सत्य नाकारता येत नव्हतं.

चौकशी आणि तपास करतांना मोटो ऑफ मर्डरच्या दृष्टीने पोलिसांना लक्षात आलं होतं की गंधाली निर्दोष असावी. हॉस्टेलवरील सर्वांचे स्टेटमेंट्स, इतर चौकशी आणि तपास पूर्ण होऊन निकाल लागायला बराच वेळ लागणार होता. तिला किती दिवस रिमांड होममध्ये रहावं लागणार माहित नव्हतं. झाल्या प्रकारामुळे गंधाली खूप खचली होती. ही घटना घडल्यानंतर जवळ जवळ दहा दिवसांनी अभि आला आणि पुढे दोन दिवसांनी अवि. गंधाली अजूनही संशयिय आरोपी होती. जुविनाईन कोर्टमध्ये ट्रायल सुरु होती. फौजदारी न्यायालयात केस जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. बेल मिळायला उशिर होत होता. कारण होतं गंधालीचे बर्थ सर्टीफिकेट. जुविनाइन कोर्टसमोर ते सादर करणं अत्यंत गरजेचं होतं.

जगताप परिवार काळजीत होता. तिचा शाळेचा दाखला, इतर सर्टीफिकेट सर्व सादर करण्यात आलं, मात्र जन्माचा दाखला ते सादर करु शकले नाही.

मी आणि सचिन रांजणवाडीवरुन आणू का? मी राधाक्काला विचारलं तर त्यांचे डोळे भरुन आले.

मला त्या दिवशी कळलं गंधाली चिन्मय आणि तन्मयची सख्खी बहिण नव्हती.

कालांतराने या केसच्या तपासात पोलिसांना लक्षात आलं होतं की प्रणालीच्या खुनामागे तिच्या कंपनीतील दोघेजण कारणीभूत होते. एकतर्फी प्रेमप्रकरणातून हा खून झाला होता. गंधालीची सुटका होण्याची आशा होती. तसेच जन्माचा दाखला न मिळाल्याने तिला जुविनाइन कोर्टाचा फायदा मिळणार नव्हता. या केसच्या ट्रायल दरम्यान आपल्या हिमतीवर उभी राहिलेली, आर्थिकरित्या स्वतंत्र झालेली ती धीट गंधाली हरवून गेली. नियतीचा हा खेळ तिच्या काय आमच्याही आकलनशक्तीच्या बाहेरचा होता. त्यात तिला तिच्या अस्तित्वाच्या खुणा कळल्या आणि ती आणखिनच हतबल झाली. राधाक्का, काका सगळेच तिला समजवून सांगत होते, या अनाहूत प्रसंगामुळे ती खचतच गेली.

बर्थ सर्टिफिकेट न मिळाल्याने केस जे एन एफ सीत ढकलण्यात आली. तपास- ट्रायल-कोर्टच्या सोपस्कारात खूप वेळ गेला. या काळात आम्ही सर्व मित्र-मैत्रीणी गंधालीसाठी खंबीरपणे उभे राहिलो. निकालाच्या दिवशी कोर्टात तिची साक्ष अत्यंत महत्वाची होती कारण तिने गुन्हेगारांना पाहिलं होतं. खुनाचे कुठलंच कारण गंधालीजवळ नसल्यामुळे पोलिसांना तिच्यावर आरोप सिद्ध करता आला नाही, शेवटी तिच्यावरचे आरोप मागे घेण्यात आला. सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास टाकला. सर्वात आधी झाल्याप्रकाराने खचलेल्या गंधालीला सावरायला हवं होतं. तो दिवस आजही आठवतो मला. रिमांडहोममधून तिला घरी आणायचं होतं. राधाक्का आणि काका तिला बार्शीटाकळील परत घेऊन जाणार होते. मी आणि अवि रिमांडहोमला पोहचलो होतो. अभि पोलिसांची परवानगी घेऊन येणार होता. अवि आत ऑफिसमधले सोपस्कार पूर्ण करत होता. मी व गंधाली पोर्चमध्ये बसलो होतो. रडून रडून ती दमली होती. तिच्या मनात काय काहूर माजला असेल याची आम्ही फक्त कल्पनाच करु शकत होतो. ती तिची घालमेल व्यक्त करु शकत नव्हती, मला काय सर्वांनाच तिची खूप काळजी वाटत होती.

नेमकी मोहनचा फोन आला, त्याचे वडिल सिरियस होते. मला ताबडतोब दवाखान्यात पोहचायला हवं होतं. कसाबसा गंधालीच्या हातातला हात सोडवून मी आत जाऊन अविला कळवलं, अभि परवानगी घेऊन पाच-दहा मिनटात पोहचणार होताच. नाइलाजाने मी तिला तिथेच बाकावर एकटीला सोडून निघाली खरं, अवि आहे आत आणि अभि पोहचेलच आत्ता या भरवश्यावर मी तडक निघाले. ती माझी आणि तिची शेवटची भेट.

तीच माझी आणि तिची शेवटची भेट.

रात्री घरी आले तर राधाक्का, काका, चिन्मय- तन्मय, सचिन सगळेच काळजीत होते. अभि- अवि आणि गंधाली तिघांचाही पत्ता नव्हता. तिघांची खूप वाट बघितली. नंतर शोधायचा खुप प्रयत्न केला. नक्की काय झालं माहित नाही?

तेव्हांपासून आज काय ती तिची बातमी कळली. अवि-अभि .... त्या दिवशी नेमकं काय झालं ते त्यांनाच ठाऊक.

५

**चिन्मय**

अभिचा फोन आला. त्यानं जे सांगितले ते ऐकण्यासाठी किती वर्षांपासून आतूर होतो. एक वेडी आस होती. बहिण-भावाचं प्रेम होतं ते. असंच कधी कोणी सोडून जातं का? सारख मनात यायचं. आज कसं आकाश मोकळं झाल्यासारखं वाटत होतं. आनंद शब्दात मांडता येत नाहीय सिद्धी. जिच्या सोबत बालपण घालवलं, हरवलेली ती बहिणीची माया आज गवसली. .

"सिद्धी....आपली गंधाली सुखरुप आहे."

"अंगणात फुलं वेचणारी गंधाली आजही आठवते ग. शाळेला सुट्ट्या लागल्यावर आम्ही अमरावतीहून, आजीकडून बार्शीटाकळीला यायचो. दोन महिने नुसता धुमाकुळ असायचा. ती पायरीवर वाट बघत बसायची. आमच्या शिवाय कधीच जेवली नाही ती. माझी व तन्मयची कायम भांडण व्हायची, ती गंधालीच सोडवायची. आईचे कित्येक धपाटे तिच्यामुळे हुकलेत ग. कायम तिचा एकच धाक, गळयावर बोटाने क्रॉस करुन शपथ घ्यायला लावायची. आम्ही ती दरवेळेस मोडायचो."

आमच्या आयुष्यात ती अचानक आली आणि अचानक निघून गेली. तिचं अस्तित्व, तिच्या आठवणी मी आजवर गोंजारत जगतोय. तिला कळत होतं का माहित नाही आम्ही तिला

चपटी म्हणून हाक मारायचो. कित्ती टिंगल केली तरी कधीच चिडली नाही बघ. तन्मय तर खूप छळायचा तिला.

आजही आठवत आहे, संक्रातीला आम्ही सर्व गच्चीत पतंग उडवत होतो. शेजारच्या सुनंदाकाकूच्या अंगणातील झाडात पतंग अडकला. मी एक नंबरचा खोडकर, जिन्याने जायच्या ऐवजी पॅरापिट वरुन सज्ज्यावर उडी मारली. सज्ज्यावरुन खिडकीचा तावदान पकडत उडी मारणार तेवढ्यात पाय घसरला आणि खाली कुंडीवर आदळलो. जबरदस्त मार लागला होता. हात पाय फ्रॅक्चर आणि समोरचे तीन दात पडले होते. त्या वेळेस गंधालीने खूप साथ दिली. माझं ड्रेसिंग तर वार्षिक परिक्षा सुरु होईपर्यंत तीच करत होती.

चित्र काढून रंगवायचा भारी नाद तिला. बागकाम आटपून तास न तास चित्र काढत बसायची. आमचा बगीचा, ज्याचं नंतर नर्सरीत रुपांतर झालं, आजुबाजुला चांगलाच प्रसिद्ध होता. हातात जादू होती तिच्या.

ती कोण, कुठली कशी आमच्या अंगणात आली आणि कायमची आमचीच होऊन गेली.

खरं सांगू सिद्धी, प्रणाली प्रकरणात तिला कळलं की ती आमची सख्खी बहिण नाही ते. नाहीतर आम्ही तिला कधीच कळूच दिलं नसतं ग. ते कळल्यामुळे ती आम्हाला सोडून गेली का? हा विचार सतत यायचा माझ्या मनात.

आईची तर फार लाडकी. दोघींना जोडणारा दुवा म्हणजे बाग. आमची परिस्थिती सर्वसाधारण होती. ती हुशार होती. तिच्या शिक्षणासाठी आईबाबांनी खूप धडपड केली.

तिला शिकवण्यासाठी आई बाबांनी आधी स्वत: सांकेतिक भाषेचा अभ्यास केला.

सिद्धी, जशी तू सगळया बाबतीत टापटीप असते न तशीच ती पण प्रत्येक गोष्टीत टापटीप असायची. आई-बाबा आम्हाला सतत तिचं उदाहरण द्यायचे.

तन्मय, अवि, ती आणि मी लहानपणी खूप धमाल केलीय ग. अंगणात लपंडाव खेळायचो आम्ही. कुठे कुठे लपून बसायची ही. एकदा तर झाडांसाठी खणलेल्या एका खोल गढयात लपून बसली होती.

लपंडाव परत अशा प्रकारे खेळावा लागेल असं कधीच वाटलं नव्हतं.

लगोरी, क्रीकेट, विटी-दांडू, डबा ऐसपैस, काय काय खेळ खेळायचो आम्ही. तिला धप्पा देता येत नसे म्हणून तिला तन्मयनं एक शिट्टी घेऊन दिली होती. तीच शिट्टी दोनदा रात्रीच्या जेवणासाठी, तीनदा अभ्यासाठी, चार वेळा वाजली की अंगणात गोळा व्हायचो. तिला ऐकू येत नसलं तरी आम्ही तिच्याकडून याचा सराव करुन घेतला होता. आमचा संवाद म्हणजे खाणा खूणा आणि नंतर एक दोनदा तिच्या लक्षात आलं की भांडे पडल्यावर आम्ही दचकून सगळे येऊन बघतो. मग काय राग आला की दे दणादण भांडी आपटायची ती.

जशी जशी ती मोठी होत होती खोडकर गंधाली कमालीची शांत होत गेली. कदाचित संवादातील तिच्या अडचणीमुळे असेल. अर्थात हा आमचा तर्क होता.

गणपतीची आरास असो की महालक्ष्मीची, शेजारी कोणाकडे मंगळागौरी असो वा डोहाळ जेवण सजावट गंधाली करत असे. तिच्या हातात कला होती. दिवाळीत तिने काढलेली रांगोळी बघायला आजुबाजुच्या आळीतून लोकं यायची.

ती निघून गेल्यावर आई बाबा खुप खचले. त्यात बाबांना हार्ट अटॅक आला, त्यात ते गेले आणि आई एकटी पडली. आधी यायची इथे अधून मधून. मागील दोन वर्षात तिचा एकच ध्यास "ती येईल परत, आपलं प्रेम तिला परत आणेल." तिचा हाच विश्वास खरा ठरला बघ.

"काय झालं, ती ऋतुकडे कशी पोहचली. सगळा वृत्तांत तिथे पोहचल्यावर कळेल ग. तन्मयला फोनकरुन सांगतो. नागपूर एयर्पोर्टवरुन दोघं टॅक्सीने बार्शीटाकळीला जाऊ. सिद्धी, तुला सर्व माहिती फोनवर अपडेट करतो."

"काळजी घे. मी तुला म्हणत होते न, सापडेल ती, होईल सगळं व्यवस्थित." सिद्धी

खरंच, आधी सारखं पूर्ववत होईल सगळं?

सध्या या प्रश्नाचं उत्तर नसलं तरी पूर्वीची सगळी माणसं भेटणार होती हे नक्की.

६

**तन्मय**

**चि**न्मयचा फोन आला आणि मनावरचं ओझं कमी झालं. सहवासामुळे ज्या बंधात आपण गुंतत जातो, त्याचं एक जरी टोक निसटलं की जगणं कठीण होऊन जातं. आज त्या गुंत्यातील टोक गवसलं होतं. गंधालीच्या अचानक निघून जाण्याने आयुष्यात एक पोकळीच तयार झाली होती. किती प्रयत्न केला, कितीही आव आणला तरी आपल्या आयुष्यातील जवळच्या व्यक्तीची आपल्याला इतकी सवय झाली असते की त्या व्यक्तीशिवाय रोजचं जगण कधी कधी ओझं वाटायला लागतं.

आमची चिमणी, चिव चिव करत नसली तरी तिच्या असण्याने आमचं आयुष्य मोहरलं होतं, आमचं आयुष्य तिचे चित्र, त्यातील साऱ्या रंगछटा यांनी रंगलेलं होतं.

मी तर किती त्रास दिला असेल तिला. बाप रे! आठवलं तरी अंगावर काटे येतात.

पुस्तकांना कव्हर लावण्यापासून ते कपडे धुण्यापर्यन्त मी तिच्यावरच अवलंबून होतो. भूक लागली तर पटकन खायला करुन देणारी, प्रत्येक राखी आणि भाऊबीजेला हक्कानी भेट मागणारी. आजही ती दिवाळी मला आठवते, फटाके फोडतांना हात पोळला होता माझा. माझ्या आधी तिच्या डोळयात पाणी आलं होतं".

"हाय, कसा आहेस? का रे फोन करुन बोलावून घेतलं? सगळं ठीक आहे ना?" वृषाली

"मी बरा आहे. आपली गंधाली सापडली वृषे."

"कुठे, कशी आहे ती?" वृषाली

"चिन्मयचा फोन आला होता. आमच्या मैत्रीणीकडे... ऋतुजाकडे."

"टेबलवर जी फ्रेम आहे, ती तिनेच तुला पुणं सोडतांना दिली होती न". वृषाली

"हो, तिची आठवण आहे ती. गंधवेडी, तीने वाळलेल्या फुलांतून तयार केली होती ती."

"ती आमच्या वाढदिवसाला त्याचेच ग्रीटींग करुन द्यायची. खूप क्रिएटीव होती ती. तिने दिलेली प्रत्येक वस्तु मी जपून ठेवली आहे.

"मला माहिती आहे रे. तीन चारदा तिची आठवण केल्याशिवाय तुझा दिवस पूर्ण होत नाही ते." वृषाली

"आफ्टर माय फादर यु आर सो केअरींग पर्सन आय एवर मेट इन माय लाईफ." वृषाली

"एन्ड दट्स व्हाय आय लव यू" वृषाली

"आय नो. आय एम इगर टू मीट हर. तिने काय काय सहन केलं असेल माहित नाही ग."

"आय स्टील रिमेंबर द डे व्हेन वी मेट. शी वॉज सो शाय. खूप लाजरीबुजरी होती ती. बहूतेक त्यामुळे आमच्याशी बोलत नसावी आम्हांला आधी वाटलं. नंतर लक्षात आलं ती मुकबधीर आहे. चपटी...लाजरी-बुजरी, खोडकर होती ती. खूप वेण्या ओढायचो मी तिच्या आणि मग वैतागून ती माझ्या मागे धावायची. अंगणात किती खेळलो. खेळता खेळता मोठे झालो. आणि वन डे शी जस्ट लेफ्ट अस.......सडनली...वन डे शी केम इन टू अवर लाइफ एन्ड सडनली वन डे शी जस्ट डिसापीअर....

तिच्या या येण्यात आणि जाण्यात आमचं जे आयुष्य होतं न तेच काय आम्ही जगलो....तिची उणीव कोणीच कधीच भरु शकलं नाही."

"जस्ट चील. ऑल वील बी ओके." वृषाली

"आय नो. सापडली आहे ती आता. भेटल्यावर कळेलच."

"लहानपण कसं सरलं कळलंच नाही. पुण्यात शिक्षणासाठी आलो, नंतर काही काळाने गंधाली आली. तेव्हा तर जणू तिने आईचीच जागा घेतली. घरातली सगळी कामं, आमचं खाणं पिणं, आमच्या वेळेचं गणित ती कस पाळायची खरंच कौतुक वाटतं आजही. आजारपण काढलीत, मित्रांसाठी खाणं असो की परिक्षेच्या दिवसातला अभ्यास असो, रात्री उठून चहा कॉफी करुन द्यायला आनंदाने तयार असायची.

खरं तर पुण्यात तिचा छान जम बसला होता. सगळं तसं व्यवस्थित सुरु होतं. अचानक त्या प्रणाली प्रकरणाने तिच्यासकट सर्वांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली.

रिमांड होममधून सुटणार त्या दिवशीची गोष्ट आहे. ती अवि आणि अभि रात्रीपर्यंत परतले नाही. सगळे जणं एकाच चिंतेत होतो. अभि-अविची तर नाही पण गंधालीची मिसींग कंप्लेट करायची की नाही करायची.. यात वेळ गेला. नुकतीच रिमांडहोममधून सुटल्यामुळे कंप्लेट करण्याचे धाडस होईना. या केस दरम्यान तिची व अभिची एकमेंकात असलेली इनव्हाल्वमेंट आमच्या लक्षात आली होती. कदाचित हे दोघं एकत्र असावेत असा अंदाज सर्वांनी बांधला त्यांनी सांगितले असते तर त्यांच्या संबंधाला कोणाचीच हरकत नव्हती. काय घडलं असेल हे तर बार्शीटाकळीला गेल्यावरच कळेल.

एनी वे वृष, चिन्मयशी बोललो मी. परवा शनिवार, सुट्टी आहे. आम्ही दोघं नागपूर एयर्पोर्टवर भेटू, तिथून टॅक्सीने थेट घरी जाऊ. आईकडे सगळे जणं जमत आहोत. आम्ही जीवाभावाची माणसं, आयुष्याच्या एका वळणावर काळाच्या ओघात एकदा एकमेकांचे हात सुटलेत. मात्र आता परत असं कधी होऊ देणार नाही. खरंच, त्यांच्याशिवाय जगणं किती निरर्थक

आहे, हे मला परिस्थितीने शिकवलं. आपलं मनापासून कौतुक करणारं, पाठीवर शाब्बासकी देणारं असलं की ते जगायला उर्मी देतं.

७

## अविनाश

ऊन उतरणीला लागलं आणि राधाक्का आरामखुर्चीत येऊन बसल्या. खरंतर त्या रोज खाली अंगणात बसायच्या, हल्ली पायांच्या दुखण्यामुळे पायऱ्या उतरायला त्रास होऊ लागला आणि त्यांची आरामखुर्ची इथे गच्चीवर आली. आरामखुर्चीत संध्याकाळची दिवेलागण होईपर्यन्त त्यांचा मुक्काम आणि तानी आल्यावरच घराच्या आत जायचं. बसल्या बसल्या आधी अंगणातल्या फुलबागेवर मायेने नजर फिरवायची नंतर फाटकापाशी नजर खिळली की नकोशा आठवणींचा आवंढा गिळून डोळे गच्च मिटून घ्यायचे. हा आमच्या राधाक्काचा नेहमीचाच दिनक्रम.

राधाक्का ..... आमच्या अख्या आळीची राधाक्का. उंच, धिप्पाड, डोळयात निळसर झाक आणि गोरी गोरी पान, वय साधारण सत्तरीच्या आसपास. चोप्पुन नेसलेलं इरकली नववार आणि पांढरे पिंगट कुरळे केस. आळीतले लहान मोठे, ओळखीपाळखीचे सारेच तिला राधाक्का म्हणत. माझं घर अक्काच्या अगदी लागूनच, आमच्या सज्ज्यावरुन राधाक्काचा सज्जा न्याहाळणं हा माझा आवडता आणि जुना छंद .... गंधालीकडे मी याच सज्ज्यावरुन बघत बसायचो. मी आणि ती दोघेही राधाक्काच्या अंगणात लहानाचे मोठे झालो. कधीकाळी सर्वांचा आधारवड असलेल हे राधाक्का नावाचं झाड आज मात्र एका निष्पर्ण झाडाप्रमाणे भासत होतं. तिच्या आयुष्यातील हिरवी पानं काही पिवळी होऊन गळून गेली तर काही वाऱ्याच्या झोत्यात उडून गेली. मी ही असंच एक उनाड पान, मी माझं झाड शोधत या रांजणवाडीत आता परत आलो होतो.

रोजसारखच आजही राधाक्काच्या सहनसिद्धीने डोळ्यांच्या कडेची हद्द ओलांडली नाही. ओलसर कडा हलकेच पदराने टिपत अंगणाकडे एक नजर फिरवली, फाटकावर

रातराणीचा मदमस्त वेल ऐन बहरात होता. अर्धवट उमललेल्या कळयांचा मंद सुगंध वाऱ्याच्या तालावर अंगणभर नाचत होता. त्या गंधाने तिच्या सुरकुतलेल्या तनुवर शहारे उठले आणि क्षणात विरलेही. रोजच्याप्रमाणे आजही तिन्हीसांजेच्या प्रकाशात फाटकापाशी नजर खिळली आणि तिने डोळे गच्च मिटून घेतले.

मी, .. अविनाश सुनंदा देवघरे. गेल्या महिन्यातच आलो, पुणं सोडून कायमच .. ? अजून तरी तसं ठरवलं नाही काही. आधी या घराचं काय ते ठरवतो मग बघू पुण्याला परतायचं की नाही.

"राधाक्का अग राधाक्का ... अंधार व्हायला आलाय .... निदान व्हरांड्यातला दिवा तेवढा लावयाचा हो." तानी

“अरे हो, अविदादा जेवायला येणार का आज? “बटन चाचपडत तानी पुटपुटली.

राधाक्का डोळे बंद करुन तशीच पडून होती. नकोशा हव्याशा आठवणींना बळेच घालवत ती उठली.

"हम्म्म आज काय करु? शेवग्याची आमटी आणि भात ..चालेल का ग अक्का?" तानी

"काहीही कर. दोन घास बळेबळेच तर पोटात ढकलायचे" उदास आवाजात राधाक्का म्हणाली.

"जरा अविला आवाज दे ग? राधाक्का

"हे काय आलोच मी, तानी दोन घोट चहा ठेव" अविनाश

"आत्ता या वेळेस?" तानी

"म्हणतोय तर ठेव की तानी" राधाक्का दाटत म्हणाल्या.

उगाच जड झालेल्या पापण्यांना आवरत आणि थकलेल्या देहाचा तोल सावरत राधाक्का देवघरापाशी गेली.

"हे बघ अवि, देवघरातील सगळे देव माझ्यासारखीच तिची आतुरतेने वाट बघतात रे. हे माझ्या आयुष्यातील साऱ्या घटनांचे साक्षीदार, कित्येक वर्षांपासून मी यांच्यापुढे नतमस्तक होते, माझ्या आर्त हाकेनी यांच्या काळजाचा ठाव घेतला नाही वाटतं अजून. हल्ली रागही येत नाही यांचा. आयुष्याचा खडतर प्रवास पार करण्यासाठी सामर्थ्य तर यांनीच दिलं ना. ते रे कसं विसरु. उदबत्तीच्या धुराच्या वलयात काही आठवणी विरतात का याची तिने थोडा वेळ वाट बघितली, पण छे नाहीच ....

का कोण जाणे ही कुठे असेल? काय करत असेल? गंधाली.... ये ग पोरी लवक र ये." राधाक्का पुटपुटली

"कशाला उगाच तिला आठवता तुम्ही अक्का?" तानी

"आता माझ्याजवळ या आठवणींशिवाय आहे तरी काय ग ताने." राधाक्का

"त्रास होतो हो तुम्हाला, तो बघवत नाही ना." तानी

"त्रास ... त्रास .. कसं ग म्हणु मी .. या जन्मीच माझं संचित आहे ते." राधाक्का

"संचित की ऋण ग अक्का, बरं बरं असु द्या तो विषय. यायची असेल तर येईल ती. अविदादा हा चहा घ्या आणि अक्का तुमच्या औषधाचीही वेळ झाली हं" तानी

मग उगाचच हा कुठे? तो काय करतो? रांजणवाडीच्या गप्पा झाल्यात.

"काय रे अवि काय ठरवलंस घराचं. आपलं आडवाटेवरचं घर फारसा भाव नाही यायचा रे." राधाक्का

"हो, दोन-तीन लोकं येऊन बघून गेलेत.. बघु काय होतं ते." अविनाश

"का रे बाबा? नक्की विकणार आहेस ना घर?" माझ्या चेहऱ्यावरचे बैचेन भाव टिपत राधाक्का म्हणाली

"महिना होईल तुला येऊन, काय पुण्याला परत जायचा विचार आहे ना?" राधाक्काच्या अनुभवी नजरेतून माझी घालमेल सुटली नाही.

मी तरी काय सांगणार? जिच्यात जीव अडकला होता ती तरी पुण्यात कुठे आहे. कसं सांगू राधाक्का मी गंधालीसाठी पुण्यात गेलो होतो. तू काय आणि मी काय दोघंही तिच्याच वाटेकडे डोळे लावून बसले आहोत.

गंधाली ...... मी भूतकाळात रमणार या आधीच तानीने हाक दिली.

"चला आमटी भात खाऊन घ्या "

जेवतांना तिघंही गप्प होते. तिघांच्या मनात एकच विचार .... गंधाली

गंधाली कुठे असेल? या विचाराने आजही झोप येत नव्हती, विचार थकेपर्यंत कुस बदलत रहायची, केव्हातरी पहाटे डोळा लागायचा. हे अनेक वर्षांपासून सुरु होतं. नाही गंधालीला त्यादिवशी रागारागात एकटं सोडल त्या दिवसापासून.

मी तर होतोच अवलीया. आज इथे तर उद्या तिथे. एकच ध्यास एकच ध्येय एक अशी डॉक्युमेंट्री तयार करायची ज्याला नॅशनल आणि इंटरनॅशनलस अवॉर्ड मिळालं पाहिजे. या नादात मैत्रीही विसरलो. अभि, तू तरी बोलायला हवं होतं. मी तुमच्या दोघांच्या मधे आलो नाही. पाठीवर सामान घेऊन जगणारा माणुस रे मी. तिला हवं असलेलं स्थिर सुरळीत आयुष्य मी देऊ शकलो नसतो. आधी मला वाटलं गंधाली तुझ्या सोबत आहे. जेव्हा कळलं तू तिच्या सोबत नाही, आजही तळमळ मला ना जगू देत ना मरु देत.

आयुष्याच्या वळणावर असाही एक दिवस येईल असे त्याला कधीच वाटले नव्हते. रागाचा तो क्षण....तो आठवला की त्या क्षणाने हिरावलेली मैत्री आज तो आळवत होता. म्हणतात न निसटलेले क्षण परत येत नाही. तो आज अनुभवत होता....आताशा स्वत:चा राग नाही कीव येते हे ओझं घेऊन आता जगायच.

मी अभिशी बोलायला हवं होतं. कदाचित हा प्रसंग ओढवला नसता. मग अभि आणि गंधाली कुठे निघून गेले? पुढे काय झालं असेल? परत त्याच चक्रव्युहात अडकायच.....संभावनेचे अंदाज बांधायचे आणि फक्त वाट बघायची. गंधाली.....कुठे आहेस...

राधाक्काकडून चिन्मय-तन्मयचा फोन नंबर घेऊन चौकशी करावी का? राधाक्का आणि गंधालीसाठी हे धाडस त्याला करावच लागणार होतं.

सकाळी आधी राधाक्काकडुन फोननंबर घेऊन दोघांशी बोलायचंच त्यानं ठरवलं आणि डोळे गच्च बंद केले.

८

## राधाक्का

अवि जेऊन गेला. माझ्या डोळ्यासमोरुन गंधाली काही जाईना. मन व बुद्धी दोन्हीही तिच्या विचारांपुढे हतबल झाले होते. हल्ली ही जीवघेणी अवस्था रोजच माझ्या सर्व जाणीवांना मनातील एका खोल चिरेबंदी वाड्यात बंद करुन मला एकाच या गंधाली नावाच्या कोंडीत गाठायची आणि मी त्यांना शरण जायचे. हल्ली रोजच फाटकापाशी तीन-चार वर्षाची अंग चोरुन बसलेली पोर दिसते आणि मी आपले डोळे गच्च मिटून घेते. रोज रोज त्याच वीस वर्षांच्या आठवणी फाटकातून अंगणात आणि अंगणातून वर माडीवर धापा टाकत येतात आणि नको नको म्हणत उगाच पिंगा घालायला लागतात. रोजची आधीच विराण संध्याकाळ आणखीनच भयाण भासु लागते. हा जीवही किती चिकट बघ. ती आल्याशिवाय हा देह विझायचा नाही. या गंधालीच्या आठवणीने परत बैचेन व्हायला लागलं. ती आमच्या आयुष्यात अचानक आली आणि आमची बाग फुलवून अचानक निघून गेली.

बार्शीटाकळीला येऊन आता अठ्ठावीस- तीस वर्ष होतील आणि गंधालीला आमच्या आयुष्यात येऊन वीस वर्ष. हो वीस वर्षचं. राधा रमाकांत जगताप या नावाने राधाक्काची जागा घेतली तेही गंधालीमुळेच. आजही मला आठवतंय;

"आमच्या रांजणवाडीच्या मागे मोठ्ठं मैदान होतं. अधुनमधुन वडारी, गारुडी यांचे बिऱ्हाडं यायचे. पंधरा-वीस दिवस कधीकधी दोनतीन महिने राहून निघून जायचे. या वडारीण

बांगड्या,टिकल्या, पावडर, कुंकु, नेलपेंट, कंगवे काय काय सामान आणून विकायच्या. कधी कधी अंगण साफ करुन द्यायच्या. पाच-दहा रुपये कधी शिळी पोळी भाकरी दिली तरी खुश व्हायच्या.

राणी अशीच एक वडारीण, रोज प्यायचं पाणी आमच्या बागेतूनच न्यायची. पाणी भरुन अंगण स्वच्छ झाडून सडा टाकून द्यायची. एक दोनदा तिच्या सोबत तीन-चार वर्षाची पोर बघितली.

"राणी, तू तर म्हणलीस की तुला दोन पोरच आहे, मग कोण ग ही टप्पोरे डोळे अन अपऱ्या नाकाची." मी विचारलं

"देवजाने कोन हाय ती, मला नाय ठाव." राणी

"अग, रोज तुझ्या सोबत येते आणि तुला माहित नाही?" मी

"हं! आमी शहानूरला दर्ग्यावर गेलोतो, तवापासूनच चिकटली हाय आमाला." तम्बाखुची चिमटी तोंडात कोंबत राणी म्हणाली.

"येते माज्या मांग मांग. चार काम करते. दिलं ते खाते अन गपगुमान झोपते. तरास काय नाय तिचा." राणी

"अग नाव काय तिचं?" मी

"काय बी बोलीत नाय बगा. भेटल्यापासून काय बी नाय बोलली." राणी

सहज बघितलं तर ती इवल्याश्या हाताने बकुळीचे फुलं गोळा करत होती. का कोण जाणे त्या निरागस जीवासाठी उर भरुन आलं. राणीसोबत ती रोज येऊ लागली. अंगणात ते पोर बागडायला लागलं. तिचे टप्पोरे डोळे, कुरळे केस, गोरी पान आणि अपरं नाक, लोभस होती पोर. काही वेळातच तिनं लळा लावला. माझी पोरीची आस कळत नकळत तिच्या मार्फत पूर्ण होत

होती. आणि मी सहजच तिच्यात गुंतत गेले. अंगणातून ओसरीवर आणि नंतर घरात ते पोर बागडू लगलं.

चिन्मय व तन्मय अमरावतीला शिक्षणासाठी गेल्यावर जी पोकळी तयार झाली होती ती या चिमणीने भरुन काढली होती. अंगणातच ती जास्त रमायची. फुलं गोळा करणं तिचा आवडता छंद, फुलं गोळा करुन प्रत्येक फुलाचा गंध घेत अंगणभर बागडायची. हे तर तिला गंधालीच म्हणायचे. हळूहळू लक्षात आलं की आपण काय बोलतोय तिला कळत असलं, तरी ती बोलू शकत नव्हती. क्षणभर आम्ही हळहळलो, हिचं पुढे कसं होणार या विचाराने जीव कासावीस झला. राणीला अनेकदा तिच्याबद्दल विचारलं, तिला तिच्याबद्दल काहीही माहिती नव्हती. ती कोण? कोणाची मुलगी आहे? असं कसं तिला दर्ग्यावर सोडली असेल? काहीच कसा ठाव ठिकणा नाही हिचा? तिला पाहिलं की तऱ्हे तऱ्हेचे विचार मनात दाटून यायचे. या प्रश्नांची उत्तरे कधी मिळतिल का? कोण जाणे?

गंधाली, आळीतील सर्व तिला गंधाली म्हणू लागले. हळूहळू सर्वांनाच तिचा लळा लागला. कोणी खायला तर कोणी जुने कपडे देत असे. चिन्मय व तन्मय अमरावतीहून शनिवार रविवार यायचे, ती या मुलांसोबत अणि आळीतील इतर मुलांबरोबर बागडु लागली. तीन चार माहिन्यात गंधाली चांगलीच रुळली होती.

तिच्यात व माझ्यात एक अनामिक नात्याची वीण आकार घेत असतांना राणीने अचानक एक दिवस सांगितलं दहा बारा दिवसात त्यांचा मुक्काम इथून हलणार आहे. या अबोल चिमणीच्या दुराव्याच्या कल्पनेने उर दाटून आलं, क्षणभर सुचेना काय करावं, या विचारांतून कसं स्वताला सोडवावं, देवावर व नियतीवर हा प्रश्न सोपावून मी तत्पुरता मार्ग काढला होता खरा, का कोण जाणे एक अनामिक हुरहुर काळजाचा ठाव सतत घेत होती. जेव्हा जेव्हा मी

गंधालीपासून मनाने आणि विचाराने दूर जयचा प्रयत्न करायची तेवढेच मी तिच्यात गुंतत होते. अशातच रोज येणारी राणी एक दिवस आली नाही आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला, वाट बघण्यात दुसराही दिवस गेला. गंधालीत गुंतलेल्या मनाला मी मोकळं करण्याचं सारे प्रयत्न निष्फळ ठरले होते. तो निरागस चेहरा डोळ्यासमोरुन जात नव्हता.

ओसरीवरुन मी उठून आत जाणार तेवढ्यात राणी वडारीण धापा टाकत फाटकापाशी आली, कवटाळलेल्या त्या अबोल पोरीला तिने अंगणात सोडलं आणि ओरडून म्हणाली ; "मालकानं या कार्टीला न्यायचं नाय सोड इथच म्हंटला, आमचा गाडा निघनार न्याहरी करुन, म्हनून तुमच्यापाशी हिला घेऊन आले बघा, मी नेली असती पर काय करनार गाड्यात समद्याचं ऐकाया लागतं. बगा तुम्ही ही कोन....कोनाची...कुठ्नं आली काय बी ठावठिकाना पत्ता नाय, शहानूरच्या दर्ग्याला आमच्या गाड्यात आली अन रुळली बगा, पन रस्त्यावर असंच सोडवना म्हनून तुमच्याकडे आनलं, आता बगा तुमीच काय ते...."तिचे दोन आंगडे हातात देऊन राणी दिसेनाशी झाली.

ते पोर भेदरलेल्या नजरेनं सगळं बघत होतं. कित्ती वेळ ती पोर फाटकापाशी अंग चोरुन बसली होती. कोणाच्या वाटेकडे तिचे डोळे होते? बहूतेक राणी वडारीणीच्या? ती तिला सोडून निघून गेली हे त्या चिमणीला कळलं होतं. तिचं तिने मानलेले जग क्षणात नाहिसं झालं होतं. तिला समजवून तरी काय सांगायचं, या विचारात मी फाटकापाशी गेली. तिला जवळ घेताच ती वेगाने माझ्या कुशीत शिरली. त्या क्षणी जी अनामिक नात्याची वीण आकार घेत होती ती वीण घट्ट झाली होती आणि मनाच्या तळाशी ते नातं पक्कं रुजलं हे मला जाणवलं. या जाणीवेतच मी तिला घरात नेलं. दिवसभर ती माझा पदर धरुन होती. आता पुढे काय? या प्रश्नानं मला पुरतं छळलं होतं.

संध्याकाळी हे घरे आले. तशी ती पोर मला आणखिनच बिलगली. तिच्या आशाळभूत नजरेनं आम्हा दोघांनाही सुन्न केलं होतं. सगळंच अनपेक्षित होतं. तिची अस्वस्थतता आम्हालाही अस्वस्थ करणारी होती. निर्णय तर घ्यायचाच होता. असं कोणीही आणून सोडलं तरी तिला असंच ठेवून पण घेता येत नव्हतं की सोडून पण देता येत नव्हतं.

"पुढे काय राधा?" रमाकांतने चहाचा कप टेबलवर ठेवत विचारले.

"हम्म, तुम्हीच सांगा काय करायचं ते." राधा

रमाकांतच्या नजरेतून माझी घालमेल सुटली नाही. तिला अनाथआश्रमात ठेवायचं या विचारानं क्षणभर स्वताचीच लाज वाटली. खरं तर बेताचीच परिस्थिती आमची. जेमतेम पगार, दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घराचे हप्ते, या पोरीची जवाबदारी आपण घेऊ शकू? त्यात हे लेकरु बोलू पण शकत नाही, धरायचं तर कसं ...

कुठल्या .....कुणाच्या हिमतीवर आणि सोडायचं तर कोणाच्या भरवश्यावर, विचार नुसतेच विचार... काय करावं काही सुचत नव्हत. काही तरी तर करायलाच हवं, नुसता विचार करुन मार्ग सापडणार नव्हता. रमाकांतने लगेचच कॉलनीतील ॲडव्होकेट लाखेंना गाठले. केस तशी सोप्पी नव्हती. पोलिसाना कळवावं लागणार होतं.

दुसऱ्या दिवशी बार्शीटाकळी पोलिस स्टेशन गाठले. घडला प्रकार सांगताच त्यांनी चाईल्ड वेलफेअरच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतलं. आता केस अकोल्याच्या मुख्य पोलिस्टेशनकडे सोपविण्यात आली. नियमाप्रमाणे खरं तर त्या पोरीची कस्टडी आश्रमाला देणार होते, ती पोर मला घट्ट बिलगलेली, ती कोणाजवळ जायला तयार होईना, शेवटी पोलिसांनी तपास पूर्ण होईपर्यन्त तिची कस्टडी आम्हालाच देऊ केली.

दर आठवड्याला पोलिसठाण्याची चक्कर टाकावी लागत होती, काही केल्या तपास लागत नव्हता. गंधालीबद्दल काहीच माहिती मिळाली नाही. अकोल्याच्या आसपासच्या भागातील कुठल्याच पोलिसचौकितील हरवलेल्या लोकांच्या यादीत तिचं नाव नव्हतं. शहानूरच्या दर्ग्याजवळचा भागही पोलिसांनी पिंजून काढला. कोण होती ही, कोणाची आणि कोणी तिला वाऱ्यावर सोडलं, काहीच ठाव ठिकाणा कळला नाही . राणी वडारीणचा ताफा जाऊन बरेच दिवस लोटले होते. तपास सुरु होता.

या सगळया प्रक्रियेत ती पोर आमच्या कुटुंबाच्या अधिकच जवळ आली होती. तिला आश्रमात सोडायचा धीर होत नव्हता. रमाकांतने चाईल्ड वेलफेअरच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने या पोरीला दत्तक घेण्याचा एक विचार पोलिसांपुढे मंडला. अनेक नियम, अटी व कायदेशीर सोपस्कार पार पाडत दत्तकविधी आटोपले. आता ती गंधाली रमाकांत जगताप झाली होती.

या सर्व धावपळीत चार-पाच महिने निघून गेले. येता जाता मागच्या मैदानावर नजर जायची....उगाच मी राणीला शोधायची. गंधाली सुखरुप आहे हे जाणण्याचा तिचा अधिकार होता. ती वडारीण या पोरीच्या काळजीत ताफा जाईल तिथे मुकाट जात असेल. तिचे व अबोल पोरीच्या अनामिक नात्याची मी एक साक्षिदार होते. ती हतबल होती, मी नाही. घेतली ती जवाबदारी पार करण्याचं सामर्थ्य मला माझ्या गजानन महाराज व माझ्या कुटुंबानं दिलं होतं. आयुष्यातील खूप कठीण निर्णय होता तो ...... नातेवाईकांनी, मित्रांनी अनेक सल्ले दिले. गंधालीची आई होण्याचा माझा निर्णय ठाम होता.

तिच्या येण्याने आमचं आयुष्य दरवळून गेलं. आम्हा दोघींना जोडणारा दुवा म्हणजे फुलं आणि फुलांचा सुगंध. माझी फुलांची, झाडांची हौस वडिलांकडून मिळालेला अनमोल ठेवा होता. वडिल अकोल्याच्या पी.के.व्ही. कॉलेजमध्ये कामाला होते. जमीन, माती, खत, झाड, पानं, फुलं यात बालपण सरलं होतं. तिचा फुलांचा नाद आणि माझी आवड यातून फुलबागेची कल्पना

साकार झाली. यामुळे थोडे फार पैसे ही मिळाले. बार्शीटाकळीतील रांजणवाडीत आमची "गंधाली" नर्सरीचे बीज रुजु लागले. फुलबागेतील झाडांसोबत तीही मोठी होत होती. नर्सरीमुळे हल्ली लोकांच येणं वाढलं होतं. सगळ्या कामात ती मला मदत करत असे. हळूहळू तिला झाडांबद्दल बरीच माहिती झाली होती. तिचे बोलके डोळेच सगळं बोलत असे. आम्हाला तिचे संकेत कळत होते. तिच्या शिक्षणाची व्यवस्था करायला हवी होती माझ्या मनात येताच :

"गंधालीच्या शिक्षणाचे बघायला हवे राधा" रमाकांतने माझ्या मनातील हेरलं होतं.

"हो, पण आपल्या वस्तीत अणि वस्तीच्या आसपासही अशा मुलांसाठी शाळा नाही,

"मग कुठल्या शाळेत घालायचं?" राधा

"बघू, चौकशी करतो." रमाकांत

आमचं अंगण रोपट्यांनी भरुन गेलं होतं. गंधाली या रोपट्यांसोबत आनंदी असायची, कधी कधी तिच्या डोळ्यात अनेक प्रश्न दिसायचे. मी तिची आई होण्याचा कितीही प्रयत्न करत असले तरी तिच्या काही अनामिक भावना मात्र मला कळत नसे. कधी मला वाटायचं की ती स्वताच्या अस्तित्वाबद्दल तर विचार करत नाही ना.

गंधाली जशी जशी मोठी होत होती ती विलक्षण शांत होत होती. आधी रोप घ्यायला कोणी आलं की धावत येऊन बघायची, विकलेल्या रोपाकडे तिचं जिव्हाळयानं बघणं अस्वस्थ करणारं असायच.

गंधालीने लावलेली रोपं छान रुजायची. हळुहळु आमच्या फुलबागेबद्दल जवळपासच्या गावांपर्यन्त माहिती पोहचली. कामं वाढत गेलं. गंधालीची स्मरणशक्ती आणि

आकलनशक्ती तीव्र होती. तिच्या शिक्षणाची सोय करण्याची गरज होती. अशातच जवळच्या गावाचे पोलीसपाटील गायकवाड आमच्याकडून काही झाडं घ्यायला येत असे, त्यांच्या बोलण्यातून एकदा त्यांच्या मुलीला सांकेतिक भाषा येत असल्याचं कळलं.

"राधाक्का, मी येत असतो वरचेवर या गावी." गायकवाड

"पुढच्या खेपेस येतांना पोरीला बरोबर घेऊन येतो" गायकवाड

एक दिवस खरंच गायकवाड त्यांच्या मुलीला सुगंधाला घेऊन आले. सुगंधा पुण्याला शिकायला होती. मी, हे नंतर चिन्मय-तन्मय सर्वांनी जुजबी व रोजच्या व्यवहारात उपयोगी पडणारी सांकेतिक भाषा शिकून घेतली. गंधालीने तर लवकर आत्मसात केली. बागेतील काम करता करता आमच्या दोघींचा हा उद्योग चालत असे.

आमच्या घरात संवादातील अडचणी संपल्या होत्या. शिक्षणासाठी चिन्मय-तन्मयच्या पुण्याला जाण्याने गंधाली हिरमुसली. सुगंधा अधून मधून येत असे. तेव्हा तिच्याकडून नवीन काहीतरी शिकण्याची तिची धडपड आमच्या नजरेतून सुटली नाही.

आकाशात झेप घेण्यासाठी या हुशार मुलीच्या पंखात आम्ही बळ देऊ शकणार का माहित नव्हतं.

एक दिवस सुगंधाचा फोन आला. पुण्यात मुक बधीर मुलींची शिक्षणाची सोय करणारे एका प्रायोजकाबद्दल सांगत होती.

रमाकांतने कर्नल बक्षींना फोन केला. सगळी माहिती घेतली. त्यांनी भेटायला पुण्याला बोलावलं. कारण सोय तिथे पुण्यातच होती. खरंच त्या दिवशी खूप आनंद झाला.

नातेवाईकाच्या ओळखीने एका वृद्ध जोडप्य़ाकडे तिघा भावंडाची रहायची सोय झाली. पोरांनी होस्टल सोडलं. त्यांची सोय लावून मी आणि रमाकांत समाधानाने घरी परतलो.

हा शेजारचा अविही सिनेमाचा कोर्स करायला पुण्यात गेला.

काळ भराभर पुढे जातो. मुलं किती पटकन मोठी झाली. चिनू-तनूने तर पुढच्या शिक्षणासाठी पुणं सोडलं. अवि पुण्याला असल्यामुळे गंधालीच्या रहाण्याचा प्रश्न मिटला. होस्टेलवर रुळली होती पोर. नेमकी ते आरोप, कोर्ट-कचेरी यासगळयाने पार खचून गेली होती. मी आणि रमाकांतने ठरवलं होतं, रिमांड होममधून तिला इथेच आपल्या बार्शीटाकळीला आणायचं. परत नर्सरी आणि शिवणकामाचा व्यवसाय तिला सुरु करुन द्यायचा. असं काय घडलं आणि काहीही न सांगताच ही पोर कुठे निघून गेली ते आजवर ठाऊक नाही.

"राधक्का, किती उजळवणार त्याच त्याच आठवणी. दिवा मालवते मी. झोपा आता" तानी

"रमाकांत, तुम्ही सुटलात खरे, मी अजून या चक्रव्यूहात अडकलेले आहे. ये पोरी, लवकर ये. सहनसिद्धी संपत आली ग" जपमाळ टेबलावर ठेवत राधक्का पुटपुटली.

"तानी, अवि आला. चहाचं आधण ठेव . आंघोळीच्या पाण्याचा हंडा ही ठेव गॅसवर."

"आलास, काल बोलायच्या नादात विसरले हो तुला सांगायला. लांजेवार काका तुझ्या घराच्या व्यवहाराबद्दल विचारत होते. भेटुन घे त्यांना."

"राधाक्का, आधी चिन्मय- तन्मयचे फोन नंबर देता का?' अवि

"ती टेलिफोनच्या बाजुला करड्या रंगाची डायरी आहे. पहिल्याच पानावर आहे नंबर"

"फोन व्यस्त येत आहे ....परत थोड्या वेळाने लावतो." अवि

चहा पितांना चिन्मयचा फोन आलाच. कसा? काय? कुठे? सवाल जवाबानंतर थेट विचारलं "गंधालीबद्दल काहि माहिती?"

त्याने रागात फोन ठेवला, हे राधाक्का काय तानीला ही कळलं.

"अरे त्याला माहित असते तर मी इथे कशाला रे कुढत बसले असते."

"त्याचा फोन आला तर सांग त्याला, मला बोलायचं आहे त्याच्याशी." चहाचा कप ठेवून अवि निघाला

दिवसभराचा थकला भागला पक्षीसुद्धा आपल्या घरट्याकडे परततात. अवि, जाईल कुठे? येईल परत. मला ठाऊक होते.

तिन्ही सांज झाली आणि अवि आला.

"अवि, आधी तन्मयला फोन कर रे. माझ्या समोर कर"

"हॅलो, तन्मय.....मी अवि."

"मी बोलू का?" दोघांमधली निर्वीकार शांतता बघून राधाक्का म्हणाली

"अवि, कुठे होतास रे?" तन्मयचा आवाज ऐकून अवि गहिवरला

दोघांचाही बांध फुटला. सावरल्यावर तन्मयने जे सांगितले ते ऐकून अवि आणखिनच गहिवरला.

"राधाक्का...." अवि राधाक्काच्या पायाला बिलगला

"मला थोड्यावेळापूर्वीच तन्मयचा फोन येऊन गेला. तेव्हा सगळं कळलं."

"आपली गंधाली सुखरुप आहे रे अवि. थोड्यावेळात अभिचा आपल्याला फोन येईलच"

"ताने, दिवे लाव, देवापुढे साखर ठेव ग." राधक्काचा आनंद गगनात मावत नव्हता

"अभि..... कित्ती वर्षांनी रे" अभिचा आवाज ऐकून अवि म्हणाला

त्या दोघांचं बोलणं संपलं तसं राधाक्का आणि तानीने त्याच्याकडे आशेने बघितलं. परवा येत आहेत सगळे. तन्मय-चिन्मय बॅंगलोरवरुन, अभि-ऋतुजा-सचिन आणि गंधाली पुण्यावरुन.

प्रतिक्षा संपली होती. परवा काय तो उलगडा होणार होता. असो, पोर सापडली आणि ती सुखरुप आहे हे कळल्यावर दोघांनाही हायसं वाटलं.

रोज सारखंच आजही त्या वीस वर्षांच्या आठवणी फाटकातून अंगणात आणि अंगणातून वर माडीवर धापा टाकत आल्यात आणि पिंगा घालायला लागल्या. मात्र आजची संध्याकाळ प्रसन्न होती. सुकलेल्या वेलीवर आज नक्की कळी उमलली असणार. राधाक्काच्या मनात आलं. ती सवयी प्रमाणे आठवणीत हरवली.

आमची आजची ही रांजणवाडीचं मुळनाव केळकरवाडी होतं. अकोल्याहून १७-१८कि.मी वर आमच गाव बार्शीटाकळीजवळ, खरं तर या रांजणवाडीत अकोला शहरातून कोणला घर घेणं खिशाला परवडत नसल्याने, कोणी भांडून घराबाहेर पडलेलं, अशा अनेक कारणांनी अनेक कुटुंब शहराबाहेर बार्शीटाकळीला येऊन स्थायिक झालेले होते. सुरवातीला सोयी खुपच कमी होत्या नंतर आमची वाडी हळुहळु मोठी होत गेली. अगदी सुरवातील केळकरकाकांच किराणा व भुसारमालाच एकमेव दुकान होतं. म्हणून सगळे याला केळकरवाडीच म्हणत असे. आमच्या या वाडीत पाण्याचे अतोनात हाल, जसं जसं घरं वाढायला लागलीत तश्या पाण्याच्या समस्या वाढत गेल्या. केळकरकाकांनी तहसील कचेरीच्या खेपा करुन करुन त्यांच्या दुकानासमोर एक हातपंप बसवून घेतला आणि एक १००००लिटरचे कलशाच्या आकाराचे रांजण बसवून घेतले. काळाच्या ओघात केळकरकाकांचे दुकान बंद पडले त्यांच्यानंतर ते चालवायलाही कोणी नव्हतं. काकांच्याच दुकानातील एका नोकराची आता तिथे एक चहाची टपरी आहे. केळकरवाडीचे अस्तित्व दाखवणारे ते रांजण आजही रांजणवाडीचे प्रतीक म्हणून टिकून आहे. काही वर्षांनी तर ही केळकरवाडी होती हेही लोकं विसरुन जातील. या रांजणवाडीत आलेल्या प्रत्येक कुटुंबाची आपली एक कथा आणि व्यथा होती. केळकरकाकांनतर आमचं कुटुंब या वाडीत रहायला आले. मी राधा, माझे पती रमाकांत माधव जगताप आणि माझे दोन मुलं चिन्मय आणि तन्मय. नंतर शेजारी कन्नड कुटुंब शिवानंद कुलकर्णी त्याची बायको उमा, उमेश आणि रमा ही दोन शाळकरी पोरं. तिनेच तर माझं नामकरण अक्का केलं आणि हळुहळु मला सगळेच राधाक्का म्हणू लागले. देशमुख, गायकवाड, नदीम, लांजेवार, नवाब, खरे, गायधनी, कुकडे अशी जवळ जवळ चाळीस-पन्नास कुटुंबाची आमची वाडी. वाडीभवतीचा परिसर फारसा प्रगत नव्हता. मागच्या बाजूला चार-पाच एकरचे मोठे मैदान होतं. तर डावीकडची जागा भांडाभांडीतली होती. दरवेळेस कोणी तरी येऊन आपल्या मालकीहक्काचा बोर्ड लावून जात असे. मग कळलं की रहीम आणि सलीम शहानुरला रहाणारे दोन सावत्रभावांचा या जमीनीवरुन वाद चालला होता.

उजवीकडे थोडीफार दुकानं होती, हार्डवेअरच, टायरचं, बी-बियाणाचं, टाइल्स आणि सिमेंटच, पुढे मंगरुळपीर रोडवर रिक्शा स्टॅंड होता. त्याच्याच पुढे एक पेट्रोलपंप आणि त्याच्या मागे एक शाळा. ऐन दुपारी किंवा उन्हाळयात हा भाग भग्न आणि खुरटा वाटत असे. शाळेभवती मात्र अनेक वस्त्या होत्या. तिथे आमच्या रांजणवाडीपेक्षा अधिक चहलपहल असायची.

"आंगण साफ करुन देऊ का? एका वडारणीच्या आवाजाने राधाक्का भानावर आली.

"ये बाई, सडाही घाल हो आज. सगळया झाडांना पाणी दे." राधाक्का

९

## प्रयुक्ती

राधाक्का आणि अवि आतुरतेने वाट बघत होते. आधी चिन्मय-तन्मय बार्शीटाकळीला पोह्चले. मग थोड्यावेळाने अभि, ऋतु, गंधाली आणि सचिन पोह्चलेत. राधाक्काला बघताच गंधाली कमानीतून तीर सुटावा त्या वेगात आली आणि तिला बिलगली. तिला सुखरुप बघून सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतं. अविरत अश्रुंधारा बरसत होत्या. राधाक्काने तिला शांत केलं. राधाक्काची माया आणि सर्वांचे प्रेम बघून गंधाली भारावली होती. तिच्या बोलक्या डोळयात स्वत:च्या  वागण्याचा तिला होत असलेला पश्चाताप ऋतुच्या नजरेतून सुटला नाही. राधाक्काच्या अंगणात त्याक्षणी फक्त गंधालीचे उसासे ऐकू येत होते. कोणालाच बोलण्याचा धीर होत नव्हता. काय झालं, कसं झालं, का झालं? सर्वांच्याच मनात अनेक प्रश्न पिंगा घालत होते. अवि आणि अभि एकमेकांकडे बघत होते.

"अभि, सॉरी यार" अविने त्याला मिठी मारत म्हंटलं.

त्या मिठीत त्यांच्या मनात एकमेकांसाठी असलेली अढी विरघळली होती.

"सॉरी गंधाली" गंधालीला जवळ घेत अभि म्हणाला.

"माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती ती. आता तुला कधीच अंतर देणार नाही." अभि

चिन्मय आणि तन्मय दोघांचा हात हातात घेताच गंधालीला जणू तिची हरवलेली शक्ती परत मिळाली होती. ज्या अंगणात ती लहानाच्ची मोठी झाली, ते अंगण तिची किती आतूरतेने वाट बघत होतं. कुठल्या नादात आपण या सगळयांना सोडून जगत होतो. ती मनोमन खजील झाली होती. अंगणात पाण्याच्या टाकीजवळचा निष्पर्ण झालेला प्राजक्तबघून ती त्या झाडाखाली बसली आणि परत अश्रुंचा पूर लोटला. चिन्मय-तन्मयने तिला सावरलं. अंगणात तो प्राजक्त बाबांच्या वाढदिवासाच्या दिवशी सर्वांनी मिळून लावला होता. आता या अश्रुंनी प्राजक्त नव्याने फुलणार होता.

ऋतुचा शोध पूर्ण झाला असला तरी ताटातूट व्हायचं कारण कळलं नव्हतं.

"अवि,अभि, नक्की काय झालं त्या दिवशी?" राधाक्काने डोळे पुसत विचारलं

"मी सांगतो. मी तेव्हाच बोललो असतो तर कदाचित आज ही वेळ आली नसती" अविने डोळे पुसत म्हंटलं.

"रिमांड होममधून निघतांना घडलेली ही गोष्ट. चूक माझी होती. स्वप्नाला मोहनचा फोन आला. ती मला सांगून तिथून निघाली. मी आत ऑफिसमध्ये फॉर्मालिटिस पूर्ण करत होतो." अवि

"मी आलो तेव्हा गांधाली रिमांडहोमच्या पोर्चमध्ये बाकावर रडत बसली होती. मी पोलिसांची परमिशन ऑफिसमध्ये देऊन बाहेर आलो. मला बघताच तिला अनावर झालं. आणि ती मला बिलगली. तेवढ्यात अवि बाहेर आला. गंधालीला माझ्या मिठीत बघून खूप चिडला. आमच्या दोघांमध्ये वादावादी झाली, मारामारी झाली. राग-मत्सर दोन्हीच्या भरात क्षणभर आम्ही गंधालीचं अस्तित्व विसरुन गेलो. अवि रागाच्या भरात मला वाट्टेल तसं बोलून निघून गेला." अभि

"गंधाली मला काही तरी सांगायचा प्रयत्न करत होती. रागाच्या भरात कुठलाच विचार न करता मी तिला तिथेच सोडून निघून गेलो." अभि

"ती माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी चूक होती. मी असा का वागलो, मला कळत नव्हतं. मात्र या चुकीमूळे मी खूप काही गमावून बसलो" अभि

"नंतर हताश गंधाली माझ्या पाठोपाठ एफ. टी. आय. आय. मध्ये आली. तिने मला सांगायचा खूप प्रयत्न केला. कुठलाच विचार माझ्या धगधगणाऱ्या रागापुढे टिकला नाही. ती रडून रडून मला सांगायचा प्रयत्न करत होती. तिला तिथेच सोडून मी बाईक घेऊन निघून गेलो." अवि

"तिने तुम्हा दोघांची वाट बघितली. दोघंही परतले नाही. अवि, ती तुझ्या चौकशीसाठी एफ़.टी.आय.आयच्या ऑफिसमध्ये गेली, तिथे डॉ.प्रथमेश दांडेकरांच्या केबीनमध्ये

एका आश्रमात शुटिंगबद्दल चर्चा सुरु होती. अवि, तुझा मित्र मनोज होता त्या मिटींगला, त्यानंच "आपलं घर" या संस्थेच नाव सुचवलं. गंधालीला बघताच त्यानं तिचा संदर्भ दिला आणि ती आमच्याकडे आली." ऋतु

"खरं तर मी केव्हापासून गंधालीच्या अस्तित्वाचा शोध घेत होते. अभिने सांगितल्यावर रेकॉर्ड्स तपासत असतांना "आपल्या घरात" त्या दरम्यान एका मालिकेचं शुटिंग झाल्याची बातमी आमच्या दिक्षित काकूंनी दिली. डॉ. प्रथमेश दांडेकरांशी माझं फोनवर बोलणं झालं. तेव्हा या प्रकरणाचा छडा लागला." ऋतु

"रागाच्या भरात मी पुणं सोडून एका ट्रॅवलकंपनीसोबत गेलो. नंतर काही जाहिरातींची कामं मिळालीत. ती केली. दोन तीन महिने मी फिरस्तीवर होतो. एकदा पुण्यात आलो तेव्हा कॅम्पसमध्ये नेहमीच्या मित्रमंडळींपैकी कोणी भेटलं नाही. कोणाला फोन करायची हिम्मत झाली नाही. आधीच्या ट्रॅवलकंपनीने मला जकार्ता, बाली, इंडोनेशिया टूरच्या शूटिंगसाठी बोलवलं. मी चार-पाच महिने तिकडेच होतो. मधेच फोन चोरीला गेला. कोणाशीच संपर्क करता आलं नाही. नेहमी मनात यायचं फोन करावा. नंतर या गोष्टीला खूप उशीर झाला होता. तुम्हा सर्वांचे नंबर शोधता आले असते. तुम्हाला शोधता आलं असतं. खरं सांगू, लाज वाटत होती स्वत:चीच, आपल्या माणसात परतण्याचं धाडस नव्हतं. आई गेल्यानंतर तर मी आपल्या माणसांपासून अजून दूरावत गेलो. अभि, तू इथे आला होता तेव्हा मी तुला भेटण्याचं टाळलं. तेव्हा मला कळलं गंधाली तुझ्या सोबत नाही ते. तोपर्यंत अभि आणि गंधाली सोबत असावे मी या भ्रमात होतो. मात्र कळल्यावर गंधालीच्या काळजीने कळवळून निघतोय रोज...दररोज" अवि

"आणि मी काय, डोक्यात राग होताच. रुमवरुन बॅग घेऊन तडक बारामतीसाठी निघालो. एकच विचार सतत येत होता, अविची आमच्या संबंधाला मुक संमती होती. मग त्याने एवढा गोंधळ का घातला? गंधालीबाबतीत तो आधी का बोलला नाही. मी सवयीप्रमाणे माझ्या सोयीने अर्थ लावला." अभि

"एक क्षण गंधालीचा विचार करायचा ना?" ऋतु

"ऋतु, मी रागात असलो तरी तिचा विचार करत होतो. रिमांड होममधून बाहेर पडल्यावर दोघांमध्ये झटापट झाली, मी तावातावात निघालो असलो तरी गंधालीच्या काळजीने थोड्या अंतरावरुन मागे वळून बघितलं तर ही अविच्या पाठीमागे धावतांना दिसली. ते बघून माझं डोकं आणखिनच भडकलं" अभि

"तू घरी का नाही परतलीस? मी, बाबा वाट बघत होतो ग." राधाक्का ने खुणेने विचारले

"मानसिक त्रास ग राधाक्का. अविने आणि मी दोघांनी तिची तमा केली नाही. प्रणाली प्रकरणात तिला तुझ्या पोटची पोरगी नाही हे कळलं होतं. त्याचा सुद्धा तिच्या मनावर परिणाम झाला असेलच. जेव्हा निराशा घेरते आणि मन व बुद्धी दोन्ही हताश होतात, त्या स्थितीत उद्विग्न मन काय निर्णय घेईल सांगता येत नाही." अभि

"तिला कळत होतं राधाक्का, तुम्ही तिला कधी परकं मानलं नाही. तिच्या मनस्थितीचा विचार करता तिला तो आघात सहन झाला नसावा. बावरलेल्या गंधालीला माझ्या संस्थेची माहिती त्या वेळेस आठवली हे बरं झालं." ऋतु

"चिमणे, आमचा तरी विचार करायचा ना. किती शोधलं तुला." तन्मयने तिला जवळ घेत म्हंटलं

आपली हरवलेली माणसं परत गवसली, बावरलेल्या गंधालीला त्या क्षणी एवढच कळत होतं.

"काय अवि, अभि तुम्ही दोघांनी आमचा विचार करायचा ना? एका क्षणात सारे बंध तोडून आमच्या सर्वांच्या आयुष्यातून एकाकएकी निघून गेलात." सचिन

"सचिन,  स्वप्नाला कळव रे. " ऋतु

"हो, लगेच कळवतो. ती वाट बघत असेल." सचिन

"अग, ऋतु फोन वाजतोय तुझा." चिन्मय

"हो, माईचा आहे" ऋतुने फोन उचलत म्हंटलं

"माई, सुखरुप पोहचलो आम्ही. राधाक्का छान आहेत." माईला थोडक्यात वृत्तांत सांगून ऋतुने फोन ठेवला

"नकळत का होईना आमच्या गंधालीला तू सांभाळलस. कसे आभार मानू तुझे." राधाक्काने ऋतुचा हात हातात घेत म्हंटलं

"आभार...काय राधाक्का. हे सर्व आधीच कळलं असतं तर? असो जे होतं ते चांगल्यासाठी" ऋतु

गप्पांना उधाण आलं होतं. ऋतुचं लक्ष गंधालीकडे गेलं.

ती अंगणाकडे टक लावून बघत होती. झाडांवरुन नजर फिरवतांना जणू सगळया आठवणी तिच्याकडे धावत सुटल्या असाव्या आणि त्या ओंजळीत घेण्यासाठी ती पायरीवरुन उठली. घराकडे आणि आमच्याकडे बघत तिने डोळे घट्ट मिटून घेतले. हरवलेलं सारं आज तिला गवसलं होतं. झालं ते विसरुन तिला नव्याने प्रवास सुरु करायचा होता. डोळे उघडून तिने आमच्याकडे बघितलं, तिच्या डोळयात विश्वासाची आणि अभिमानाची चमक होती.

अनेक वर्षांनी राधाक्काच्या अंगणात किलबिलाट ऐकू येत होता. सैल झालेले मैत्रीचे गोफ परत एकदा घट्ट गुंफले जात होते.

ऋतुला नेगी चाचा म्हणतात त्या ओळी आठवत होत्या

"चला फुलारी फूलों को

सौदा-सौदा फूल बिरोला

फूल फूलदेई दाल चौंल दे

घोघा देवा फ्योंला फूल"

आज गंधाली नावाच्या या फुल्लारीने हरवलेल्या मैत्रीची फुलं गोळा करुन आणली होती. तिच्यामुळे आमचं आयुष्य अंतर्बाह्य दरवळत होतं.  हेच काय त्या क्षणी सत्य होतं.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

esahity@gmail.com

www.esahity.com